आशियातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी ग्राहक संघटनेचे मुखपत्र

RNI NO. MAHBIL/2011/39044

वर्ष १४ | अंक ५ | ऑगस्ट २०२५ | मूल्य ₹५/-

Grahak Tituka Melwawa

ग्राहक तितुका मेळवावा

मुंबई ग्राहक पंचायत

ग्राहक हिताय
ग्राहक सुखाय

MEMBER OF CONSUMERS INTERNATIONAL

मुंबई ग्राहक पंचायत
MGP 50 सुवर्ण महोत्सवी वर्ष
२०२४-२०२५

जागो ग्राहक जागो

गणपती बाप्पा मोरया

सर्जनशील सजावट

घरोघरी लाडक्या गणरायाच्या स्वागताची लगबग सुरू झाली असेल. घराची आवराआवर साफसफाई करताना अनेक वस्तू 'टाकाऊ' म्हणून बाजूला निघतील. या वस्तू फेकून देण्याआधी जरा एकदा त्यांच्याकडे नीट बघा. एकदम 'युरेका युरेका' होऊन पर्यावरणपूरक गणपती मखर सजावटीचे मुबलक साहित्य आणि कल्पना तुम्हाला सापडतील.



- प्लॅस्टिकचे तेलाचे डबे, बाटल्या, कॉफी, सॉसच्या काचेच्या बाटल्या वापरून सुंदर देखावा करता येईल. गावाकडील देखावा, आपले सण अशी संकल्पना ठरवली तर वरील साहित्य त्यात वापरता येईल. उदा. प्लॅस्टिकच्या डब्यांमध्ये धान्य पेरून शेत तयार करता येईल. काचेच्या बाटल्यांवर सुंदर नक्षीकाम करता येईल. याच बाटल्यांमध्ये धान्य भरून सुंदर शोपीस (showpiece) करता येतील.
- कार्डबोर्ड बॉक्सेसना छान आकार देऊन त्यापासून सुंदर मखर करता येईल.
- घरात अनेक ब्लाऊज पीस, ओढण्या, साड्या असतात. त्यापासून बाप्पाच्या मागील पडदा, आसन करता येईल. यावर सरस्वती चिन्ह, चैत्रांगण, संस्कृत श्लोक, सुंदर सुलेखन करून आपली संस्कृती जपणारी संकल्पना साकारता येईल.

- आपल्या आजुबाजूला उपलब्ध असलेल्या पाना-फुलांपासून सुरेख सजावट करता येईल. अगदी नारळ सुपारीच्या वाळलेल्या फांद्या, खोपटं देखील वापरता येतील. नारळाच्या करवंट्यांमध्ये झाडे लावून ती वापरता येतील. वडाच्या पारंब्या देखील विविध प्रकारे वापरता येतील. केळीच्या, आंब्याच्या पानांना सुंदर आकार देऊन तोरण करता येईल.
- घरात असलेल्या भरतकामाच्या लाकडी रिंग, एखादी फळी यांवर कागदी फुले लावून आरास करता येईल.
- वर्तमानपत्र, मासिक या रद्दीपासून फुले तसेच त्यांच्या गुंडाळ्या करून त्याची रचना करता येईल. यापासून विविध आकाराचे बाहुलाबाहुली पण साकारता येतात.

- पेपर क्विलिंग, ओरिगामी सारखी कला अवगत असेल तर त्याआधारे आरास करता येईल.
- जुन्या छत्रीचा, सायकलच्या चाकाचा सांगाडा असेल त्यावर देखील सुंदर फुलांची आरास करता येईल किंवा त्यापासून एखादा देखावा पण उभा राहील. बांबू, वेताच्या टोपल्या, सूप ह्यांचाही उपयोग करता येईल.

- तुमच्याकडे तांब्या पितळेची जुनी कळशी, घंगाळ, बंब तत्सम भांडी असतील तर ती वापरून त्यासोबत फुलं, पाने वापरून सुरेख आरास करता येईल.
- रांगोळी साकारताना शक्यतो रासायनिक रंग न वापरता फुलांच्या पाकळ्या तसेच धान्ये, कडधान्ये वापरू शकता.
- आरास करताना शक्यतो पारंपारिक दिवे, सोलर दिवे, LED लाइट वापरावेत. मुलांच्या रंगपेटीतील काचेच्या बाटल्या असतील किंवा छोट्या कॉफीच्या बाटल्या असतील तर त्यापासून पाण्यावर तरंगणारे दिवे करता येतील.

- थोडक्यात टाकावू वस्तूंना (Upcycle) अपसायकल करून सृजनशील नवा साज चढवून सर्जनशील पर्यावरणीय मंगलमय गणेशोत्सव साजरा करता येईल. यासाठी घरातील बालचमूला आपले अग्र शिलेदार बनवा बरं का! चला मग लागू या ना तयारीला... गणपती बाप्पा मोरया!

– **नेहा जोशी**

ग्राहक तितुका मेळवावा

ऑगस्ट २०२५ | श्रावण-भाद्रपद १९४७

अनुक्रमणिका

सर्जनशील सजावट	०२
संपादकीय सजग राहूया, सुरक्षितता मिळवूया!	०४
‘याचसाठी केला होता अट्टहास!’ - ॲड. शिरीष देशपांडे यांची मुलाखत	०५
‘१००%’ वाचा! चुकवू नका!!	०९
पर्यावरणपूरक उत्सव	०९
स्मार्ट फोन स्मार्टली कसा वापराल?	१०
सांताक्रूझमध्ये योग दिन साजरा	१४
‘बँकिंग’बद्दल बोलूया बँकेतील मुदत ठेवींचा पुरेपूर वापर कसा कराल?	११
ग्राहक पंचायत पेठांना नक्की या!	१२
ग्राहक पंचायत पेठ दालन तक्ता – २०२५-२६	१३
वाचू आनंदे इस्रो - झेप नव्या क्षितिजाकडे	१७
लिफ्ट मेंटेनन्स मक्तेदारी नको!	१७
हटके, हेल्दी प्रसाद	१८
करप्रणाली - नवी की जुनी?	१९
लाडू, पेढे, बर्फी... अवघी मिठाई माझी!	२१
बोरिवलीत मुलांसाठी पर्यावरण शिबीर	२२
७ जुलै, स्थळ- जिनिव्हा, अभिमानाचा क्षण!	२३
ग्राहक पंचायत पेठ वेळापत्रक	२४

RNI No. MAHBIL/2011/39044

मुंबई ग्राहक पंचायत

विश्वस्त मंडळ
डॉ. बाळ फोंडके
अनुराधा गोरे
ललिता कुलकर्णी
अनुराधा नरसाळे
संजीव मंत्री

अध्यक्ष
डॉ. बाळ फोंडके

उपाध्यक्ष
अनुराधा गोरे

कार्यकारी मंडळ
ॲड. शिरीष देशपांडे (कार्याध्यक्ष, स्वीकृत)
अनुराधा देशपांडे (कार्योपाध्यक्ष)
प्रभाकर गवाणे (कार्योपाध्यक्ष)
अनिता खानोलकर (कार्यवाह, स्वीकृत)
रविंद्र सहस्रबुद्धे (खजिनदार)

कार्यकारिणी सभासद
ज्योती मोडक
शीला देवळेकर
राजेंद्र राणे
शुभदा चौकर
अनघा आचरेकर
मंगला गाडगीळ
शर्मिला रानडे
आलोक हर्डीकर
विवेक केळकर
प्रकाश पाटील
उदय पिंगळे (स्वीकृत)
नेहा जोशी
कल्पिता रानडे
विनायक सोमण (स्वीकृत)
सुधीर तावरे

निमंत्रित
संघटन विभाग प्रमुख

संपादक शुभदा चौकर
संपादकीय साहाय्य नेहा जोशी, सुमिता चितळे
सल्लागार ॲड. शिरीष देशपांडे, वसुंधरा देवधर
मुखपृष्ठ राजेंद्र राणे
अक्षरजुळणी व कला दिग्दर्शन रिद्धी नि. पाटील, तन्वी गोखले
मुद्रण इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई

या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक/संघटना सहमत असतीलच असे नाही.

Printed & Published by **NISHIKANT VINAYAK GURJAR** on behalf of **Mumbai Grahak Panchayat**, Printed at India Printing Works, 42 G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400 031 and Published at Mumbai Grahak Panchayat, Grahak Bhawan, Sant Dnyaneshwar Marg, JVPD Scheme, Juhu, Vile Parle (West), Mumbai – 400 056. Ph.: 022-4750 8541/42 (Office).
• Email : mpanchayat@gmail.com • Vitaran Email : mgpvitaran@yahoo.co.in
• Website : **https//www.mymgp.org** • Editor : **Shubhada Chaukar**

संपादकीय

सजग राहूया, सुरक्षितता मिळवूया!

आपण एखादी वस्तू खरेदी करतो, ती निकृष्ट वाटली, तिच्यापासून काही त्रास झाला तर त्या वस्तू दूर सारतो. परत ती वस्तू घेत नाही. पण अनेकदा ही वस्तुस्तिथी इतकी साधी-सोपी नसते. घातक किंवा असुरक्षित वस्तू हा आज जागतिक चिंतेचा आणि चिंतनाचा विषय झाला आहे. आता आंतरराष्ट्रीय व्यापार वाढलेला आहे. एका देशातले डिझाइन, दुसऱ्या देशातील मटेरिअल, तिसऱ्या देशात उत्पादन आणि इतर अनेक देशांत वितरण असे आता अनेकविध उत्पादनांच्या बाबतीत होत आहे. त्यामुळे कोणतेही उत्पादन निकस वाटले, त्याचा काही त्रास झाला, त्यामुळे धोका उद्भवला, अशा वेळी गप्प न बसता सबंधित उत्पादकाकडे आक्षेप नोंदवणे, राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईनवर तक्रार करणे आवश्यक आहे. न जाणो, आपली तक्रार प्रातिनिधिक असू शकते.

अशी अनेक उदाहरणे आहेत की जिथे ग्राहकांच्या तक्रारी आल्या, तर ते उत्पादन रद्द केले जाते किंवा त्यात सुधारण करून नवीन मॉडेल निर्माण केले जाते. नामांकित कंपनीचे कार मॉडेल, टायर, स्मार्ट फोन अशी काही उदाहरणे आपल्या लक्षात येतील. त्यासाठी ग्राहकांनी सजगतेने तक्रार नोंदवणे, त्याचा पाठपुरावा करणे आवश्यक असते. उत्पादकांनीही त्यांची संवेदनशीलता आणि उत्तरदायित्व स्वीकारण्याची वृत्ती दाखवणे तितकेच आवश्यक. आपण ग्राहक अशी चिकाटी दाखवण्यात अनेकदा कमी पडतो. ‘जाऊ दे’, ‘राहून गेले’, ‘नको ती झंझट’ अशी आपली मनोवृत्ती असते. त्याचे नुकसान आपण भोगतोच, शिवाय आपल्यासारख्या अनेकांना भोगावे लागते. मुंबई ग्राहक पंचायतीचे सुजाण ग्राहक म्हणून आपल्यावर ज्या काही जबाबदाऱ्या आपोआप येतात, त्यातली ही एक! निकृष्ट ग्राहकोपयोगी वस्तूची तक्रार करा!!

मुंबई ग्राहक पंचायतीची तक्रार मार्गदर्शन केंद्रे ठिकठिकाणी आहेत. सदोष वस्तूंची तक्रार करण्याबाबतचा सल्ला तेथील कार्यकर्ते आपल्याला विनाशुल्क देतात. त्यानुसार कार्यवाही करणे मात्र आपल्या हातात असते. आपली केस दुसरा कोणी लढत नाही. उत्पादनांचे अवास्तव किंवा फसवे दावे हीही मोठी समस्या आहे. अशा जाहिराती आढळल्यास त्याच्या तक्रारी ASCI किंवा CCPA कडे नोंदवणे हेही सुजाण ग्राहकांचे कर्तव्य आहे. कारण अशाने आपण ग्राहकांच्या फसवणुकीच्या शक्यता कमी करू शकतो.

अलीकडे UNCTAD ची जी परिषद झाली, त्यावेळी Consumer Product Safety या विषयावर एक सत्र झाले. आता अनेक जण ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरून खरेदी करतात. ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरून असुरक्षित, अप्रमणित, निकृष्ट दर्जाच्या आणि घातक अशा वस्तूंच्या विक्रीचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. त्यामुळे ग्राहकांचा सुरक्षिततेचा हक्क धोक्यात आलेला आहे. यंदा अनेक राष्ट्रांच्या आग्रहामुळे UNCTAD ने Consumer Product Safety नियम अमलात येण्यासाठी प्रस्ताव मंजूर केला. जगातील ४४ % देशांमध्ये सुरक्षित वस्तू मिळण्यासाठी मुळात कायदेच नाहीत. भारतीय ग्राहक संरक्षण कायद्यात याबाबत काही विशेष तरतुदी आहेत. आपले कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे यांनी त्याबद्दल सांगितले. शिवाय उत्पादन करणे ते ग्राहकांपर्यंत पोचवणारी सप्लाय चेन यांना कवेत घेणारा समग्र कायदा असायला हवा, हेही त्यांनी अधोरेखित केले.

आंतरराष्ट्रीय व्यापार वाढलेला असताना सुरक्षित वस्तूंचे कायदे अधिकाधिक कडक आणि पारदर्शक व्हायला हवेत, नाही तर एका देशात असुरक्षित ठरवली गेलेली उत्पादने दुसऱ्या देशांत पाठवण्याचे दुष्कृत्य सर्रास केले जाते. औषधे, रुग्णांसाठी उपयुक्त उत्पादने, तयार खाद्यपदार्थ, सौंदर्य प्रसाधने अशा अनेक बाबतींत हे घडत आहे. कळत देखील नाही आपल्याला! प्रत्येक देशांचे नियम सारखेच काटेकोर नसतात, पण सगळ्या जगातील ग्राहक ही माणसे असतात ना! जागतिकीकरणाची संस्कृती ही सार्वत्रिक, समान न्यायाची असावी. त्यात सोयीस्कर फायदा उठवायला वाव नसावा. म्हणूनच हा विषय संयुक्त राष्ट्र पातळीवर येणे आणि धसास लागणे महत्त्वाचे.

काही विषय ग्लोबल पातळीवरून हाक आली की आपल्या प्राधान्यक्रमात येतात. पर्यावरणपूरक ग्राहकोपयोगी उत्पादनांच्या बाबतीतही तेच आहे. आपण आपली भारतीय जीवनशैली विसरून ‘वापरा आणि फेका’ प्रकारच्या उत्पादनांचा स्वीकार केला आणि आता ही पर्यावरणघातक उत्पादने दूर सारण्याचा प्रश्न जागतिक चिंतेचा बनला आहे. असो... तूर्तास आपल्या लाडक्या गणपतीचा उत्सव पर्यावरणस्नेही रीतीने साजरा करूया. गेल्या महिन्याच्या आणि याही महिन्याच्या मासिकात त्यासाठी टिप्स दिलेल्या आहेत. तुमच्याकडेही असलेल्या आयडिया जरूर शेअर करा. सजग राहूया, सुरक्षितता मिळवूया!

- शुभदा चौकर

'याचसाठी केला होता अट्टहास!'

संयुक्त राष्ट्रांच्या व्यापार विकास संस्थेची म्हणजेच UNCTADची पाच दिवसांची पंचवार्षिक परिषद ७ ते ११ जुलै रोजी स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे संपन्न झाली. या परिषदेला संस्थेतर्फे आपले कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे आणि आपली तरुण कार्यकर्ती ॲड. पूजा जोशी-देशपांडे उपस्थित होते. ॲड. शिरीष देशपांडे यांनी या परिषदेत अतिशय महत्त्वाचे मुद्दे मांडून सर्वांची वाहवा मिळवली. तसेच जागतिक ग्राहक हितासाठी ते सातत्याने करीत असलेल्या कामाची दखल UNCTAD आणि CI च्या प्रतिनिधींनी घेतली. यानिमित्त शुभदा चौकर यांनी घेतलेली ॲड. शिरीष देशपांडे यांची मुलाखत-

प्रश्न - सर्वसामान्य ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने जिनिव्हा कॉन्फरन्सचे फलित काय?
संयुक्त राष्ट्रांच्या व्यापार विकास संस्थेची म्हणजेच अंक्टाडची पाच दिवसांची पंचवार्षिक परिषद ७ ते ११ जुलै रोजी नुकतीच जिनिव्हामधे संपन्न झाली. या परिषदेला संस्थेतर्फे मी आणि ॲड. पूजा जोशी-देशपांडे असे दोघे उपस्थित होतो. या पंचवार्षिक परिषदेत सर्वसाधारणपणे गेल्या पाच वर्षात ग्राहक संरक्षणाच्या दृष्टीने संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रांनी काय प्रगती केली याचा आढावा घेतला जातो तसेच पुढील पाच वर्षात, बदलत्या काळाचा वेध घेत ग्राहक संरक्षणासाठी काय पावले उचलावीत याबद्दल चर्चा होते आणि तशी ती झाली सुध्दा. या परिषदेला ९२ देशांतील मंत्री तसेच उच्चस्तरीय शासकीय अधिकारी उपस्थित होते. त्यामुळे त्यांना आपापल्या देशात ग्राहक संरक्षणाच्या दृष्टीने सभोवतालची नवनवीन आव्हाने लक्षात घेता अधिक प्रभावी धोरणे आखण्यास निश्चित मदत होऊ शकेल. किंबहुना ही परिषद हे एक असं व्यासपीठ आहे की जिथे वेगवेगळ्या देशातील प्रतिनिधी ग्राहक संरक्षणासाठी काय उपक्रम हाती घेत आहेत, तेथील स्थानिक समस्यांवर कशा पध्दतीने मात करत आहेत याचे अनुभव कथन करतात आणि त्यामुळे इतर प्रतिनिधींना त्याचा लाभ होतो. अनुभव आणि विचारांच्या या आंतरराष्ट्रीय आदान-प्रदान प्रक्रियेमुळे व्यापक स्तरावर या परिषदेनंतर ग्राहकांच्या दृष्टीने अधिक सक्षम पावले त्या त्या देशात उचलली जातील, अशी मला आशा आहे.

प्रश्न – United Nation's Guidelines for Consumer Protection (UNGCP) चे कोणते फायदे ग्राहकांना ४० वर्षांत झाले, याबद्दल तुम्ही तिथे नेमके काय मांडलेत?
संयुक्त राष्ट्रांच्या ग्राहक संरक्षण मार्गदर्शक तत्त्वांची म्हणजेच UNGCP ची अंमलबजावणी ९ एप्रिल १९८५ पासून सुरू झाली. त्यामुळे भारतासह अनेक विकसनशील आणि अविकसित देशांमध्ये ग्राहक संरक्षण कायदे अंमलात आले आणि त्यामुळे ग्राहक चळवळीला एक निश्चित दिशा मिळाली. एकटादुकटा, अजाण, स्वतःच्या हक्कांबद्दल उदासीन आणि असंघटित असा हा ग्राहक सक्षम होण्याची प्रक्रिया जगभरात UNGCPमुळे कार्यान्वित झाली. १९९९ मध्ये याच UNGCP मध्ये दुरुस्ती करून शाश्वत जीवनशैलीची तरतूद यात करण्यात आली आणि त्यामुळे शाश्वत विकासाच्या दृष्टीने अनेक देशांमध्ये मार्गक्रमण सुरू झाल्याचे आपल्याला दिसून येते. त्यानंतर २०१५ मध्ये या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्यास आल्या. या सुधारणा घडवून आणण्यात आपल्या संस्थेचे फार मोठे योगदान आहे, हे आता आपल्या सर्वांनाच माहिती आहे. आपण केलेली सर्वात महत्त्वाची एक सूचना म्हणजे या मार्गदर्शक तत्त्वांची सर्व देशांत प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी एका कायमस्वरूपी देखरेख यंत्रणेची स्थापना करावी. त्यावर जवळजवळ दोन-अडीच वर्ष चर्चा, वादविवाद होऊन शेवटी 'इंटर गव्हर्मेंट ग्रुप ऑफ एक्स्पर्टस (IGE)' अशी एक नवीन कायमस्वरूपी देखरेख यंत्रणा २०१६ मधे स्थापन करण्यात आली. ही जागतिक स्तरावर कायमस्वरूपी अशी आपली निर्मिती आहे हे मी अभिमानाने सांगेन. दरवर्षी जुलैमध्ये या IGEची दोन दिवस जागतिक परिषद जिनिव्हा येथे संपन्न होते. या यंत्रणेने गेल्या नऊ वर्षात ग्राहकांच्या अनेक महत्त्वाच्या विषयांवर कार्यकारी गट स्थापन करून चर्चा, अभ्यास आणि संशोधन याद्वारे ग्राहक संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या शिफारसी या व्यासपीठावर केल्या. माझ्या दृष्टीने ही जी IGE ची देखरेख यंत्रणा

निर्मिती आपल्या सूचनेनुसार झाली ती माझ्या दृष्टीने UNGCP च्या ४० वर्षांतील सर्वात महत्त्वाची आणि प्रभावशाली अशी एक घटना आहे, असे मी अधिकारवाणीने सांगू शकतो.

या परिषदेत मी आपल्या देशात असलेली नॅशनल कन्झ्युमर हेल्पलाइन (NCH) ही केंद्रशासनातर्फे चालवली जात असलेली तक्रार निवारणाची ऑनलाईन यंत्रणा याबद्दलही उपस्थितांना कल्पना दिली आणि इतर देशांनी त्याचे अनुकरण करावे अशी ही व्यवस्था असल्याचेही आवर्जून सांगितले. किंबहुना केंद्र सरकारने या NCH व्यासपीठावर अनेक सेवा पुरवठादार, ई कॉमर्सचे प्लॅटफॉर्म्स आणि मोठमोठ्या कंपन्या यांना पार्टनर्स म्हणून सहभागी करून घेतले आहे आणि त्यामुळे ग्राहकांच्या तक्रारी विनाविलंब सुटण्यास कशी मदत होते, हे देखील मी या निमित्ताने सर्व उपस्थितांना सांगू शकलो. सध्याच्या डिजिटल युगात आणि विशेष करून AI च्या वाढत्या प्रसारामुळे उपस्थित झालेल्या गंभीर प्रश्नांना सध्याच्या UNGCP मध्ये उत्तरे सापडत नसल्याने बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञानाचा आणि नवीन आव्हानांचा वेध घेत UNGCP मध्ये त्वरित काही महत्त्वाचे बदल करणे आवश्यक आहे आणि त्याकडे अंक्टाडने तातडीने लक्ष देणे आवश्यक असल्याचे मी या निमित्ताने नमूद केले.

प्रश्न - ग्लोबल ODR साठी तुम्ही गेली ६ वर्षे प्रयत्न केलेत. तो प्रस्ताव संमत झाल्यानंतरची भावना शब्दबध्द कराल? याचे कोणकोणते लाभ जगाला होतील, असे तुम्हाला वाटते? Global ODR प्रत्यक्षात केव्हा, कसे येईल?

१० जुलै, गुरुवारी ग्लोबल ओडीआरचा विषय कार्यक्रम पत्रिकेवर सकाळी पहिलाच होता. योगायोगाने तो गुरुपौर्णिमेचा दिवस होता. २०१९ पासून गेली सहा वर्षे ई-कॉमर्सच्या वाढत्या व्यवहारांमुळे उद्भवणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील तक्रारींचे निवारण करण्यासाठी अंक्टाडमध्ये ग्लोबल ODR म्हणजेच जागतिक ऑनलाइन ग्राहक तंटा निवारण यंत्रणा असावी असा विचार आपण वेळोवेळी मांडत आलो. त्यावेळी त्या विचाराला इंग्लंड, अमेरिकेसारखे प्रगत राष्ट्रांनी प्रखर विरोध केला होता. पण आपण हा मुद्दा नेटाने लावून धरला होता आणि दरवर्षीच्या जुलैमध्ये होणाऱ्या अंक्टाडच्या IGE परिषदेमध्ये या आपल्या मागणीवर वेगवेगळ्या पध्दतीने चर्चा घडवून आणत होतो. त्याचा परिणाम म्हणजे गेल्या वर्षीच्या जुलैमधील परिषदेत अनेक देशांनी या मागणीला पाठिंबा दर्शवला आणि त्यामुळे यंदाच्या परिषदेत स्वतः अंक्टाडने पुढाकार घेऊन एक सहा पानी ग्लोबल ओडिआरचा प्रस्तावच तयार केला. मुंबई ग्राहक पंचायतीने गेली सहा वर्षे या विषयाचा ज्या चिकाटीने आणि जिद्दीने पाठपुरावा केला त्यामुळे खरंतर हा प्रस्ताव मुंबई ग्राहक पंचायतीतर्फेच या परिषदेत मांडला जाणे औचित्यपूर्ण ठरले असते. परंतु अंक्टाड ही सर्व सदस्य राष्ट्रांची संघटना असून आपलं स्थान हे केवळ निरीक्षक म्हणून असल्यामुळे आपण कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव या व्यासपीठावर मांडू शकत नाही किंवा त्यावर मतदानही करू शकत नाही. कोणत्याही विषयावर आपले मत व्यक्त करण्याचा आपल्याला अधिकार निश्चितच आहे, विरोध करण्याचाही अधिकार आहे. परंतु ठराव/प्रस्ताव मांडणे अथवा मतदान करण्याचा अधिकार मात्र निरीक्षक या नात्याने आपल्याला नाही. आणि म्हणून या ठरावाच्या प्रस्तावाची व्यासपीठावरून मांडणी करण्याचा मान भारताच्या ग्राहक व्यवहार सचिव निधी खरे यांना देण्यात आला. अर्थात आपण या विषयाचा जो पाठपुरावा केला होता तो केवळ आपल्याला श्रेय मिळवण्यासाठी केला नव्हता तर आपली एक संकल्पना जागतिक स्तरावर स्विकारली जाऊन अंमलात आल्यास त्याचा जगभरातील सर्वच ग्राहकांना फायदा होईल ही त्याच्या मागची भावना होती. त्यामुळेच आपण नाही तर आपल्या देशाच्या राजकीय प्रतिनिधीला या प्रस्ताव मांडण्याची संधी मिळणे आणि अखेर तो प्रस्ताव सर्व उपस्थित सदस्य राष्ट्रांनी टाळ्यांच्या गजरात मंजूर करणे याहून अनोखा क्षण कोणता असावा!

'याचसाठी केला होता अट्टहास!' असं म्हटलं तरी हरकत नाही. त्याहूनही आनंदाची आणि सुखावणारी गोष्ट म्हणजे ज्या इंग्लंड, अमेरिकेच्या शासकीय प्रतिनिधींनी आपल्या या प्रस्तावाला गेली काही वर्षे सातत्याने विरोध केला होता त्या प्रतिनिधींनी देखील आवर्जून आपला उल्लेख करून आपल्या चिकाटीने केलेल्या पाठपुराव्याचा जाहीररीत्या गौरव केला. याहून जास्त काय हवं? त्या क्षणी मी सर्वप्रथम भावूक होऊन परमेश्वराचे आभार मानले. त्याचबरोबर शुभदा तुझ्यासह वर्षा राऊत, अर्चना सबनीस,

शर्मिला रानडे आणि माझ्याबरोबर त्यावेळी उपस्थित असलेली पूजा जोशी-देशपांडे या सगळ्यांना मनापासून धन्यवाद दिले. तुम्हा सर्वांचं यातलं योगदान हे खरोखरच अमूल्य आहे. अनुराधाचे पडद्यामागील बहुमोल योगदान या क्षणी मी कसे विसरू शकेन? आपण किती मोठं काम करून बसलेलो आहोत हे आपल्याला आज कळणार नाही, तर ही ग्लोबल ODR यंत्रणा ज्या वेळेला येत्या एक-दोन वर्षांत प्रत्यक्षात कार्यरत होईल त्या वेळेला त्याचं महत्त्व जगाला आणि सर्वांनाच कळेल. असो. "माझ्या जीवनातला हा एक अविस्मरणीय, दुर्मिळ असा सोनेरी क्षण" असं मी त्याचं वर्णन करेन. आपण लावलेलं बीज अंकुरलेलं पाहताना लहान मुलाला जो निरागस आनंद होतो तसाच आनंद माझ्या चेहऱ्यावर त्या दिवशी होता. आणखी काय बोलू! त्या क्षणी अनेक जुन्या आठवणी मनात जाग्या झाल्या. तो सबंध दिवस मी नि:शब्दच होतो, अंतर्मुख होऊन माझ्यातच मी हरवलो होते. एक वेगळीच अनुभूती होती ती!

प्रश्न - या परिषदेत Consumer Product Safety बाबतचा ठराव सुध्दा संमत झाला. ऑनलाइन व्यवहारांच्या जगात आणि भारतासारख्या विकसनशील देशांना यांमुळे काय फायदा होईल असे वाटते?

आज ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरून असुरक्षित, अप्रमणित, निकृष्ट दर्जाच्या आणि घातक अशाही वस्तूंच्या विक्रीचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ग्राहकांचा सुरक्षिततेचा अधिकारच धोक्यात आलेला आहे. अनेक ठिकाणी ग्राहकांना असुरक्षित वा अप्रमाणित औषधे, खाद्य वस्तू, सौंदर्य प्रसाधने विकल्याने गंभीर स्वरूपाच्या इजा झाल्याच्या घटनाही निदर्शनास येत आहेत. अशावेळी अनेक राष्ट्रांच्या आग्रहामुळे अंक्टाडने Consumer Product Safety बाबत प्रस्ताव मंजूर करणे हे खरं म्हटलं तर काळाची गरज होती. आज जगातील 44% देशांमध्ये प्रॉडक्ट सेफ्टी संबंधी मुळात कायदेच नाहीत. त्यामुळे ग्राहक मोठ्या प्रमाणावर याबाबतीत असुरक्षित दिसून येतो. यासंबंधीच्या चर्चेत सहभागी होताना मी भारतीय ग्राहक संरक्षण कायद्यातील प्रॉडक्ट सेफ्टी मधल्या काही विशेष तरतुदींकडे सभागृहाचे लक्ष वेधले.



पूजा, शिरीष देशपांडे आणि CERC अहमदाबादच्या आनंदिता मेहता

सबंध चर्चेचा सूर हा वस्तूच्या उत्पादकांवर जात असताना आपल्या कायद्यात त्या वस्तूंची सेवा देणारा पुरवठादार आणि विक्रेता सुध्दा अनेक वेळेला वस्तूमध्ये काही बदल करतो आणि ज्यामुळे ती वस्तू असुरक्षित किंवा घातक होऊन ग्राहकाला इजा पोहचू शकते याकडे मी सर्वांचे लक्ष वेधले. यानिमित्ताने एक आदर्श प्रॉडक्ट सेफ्टी कायदा करण्याचा विचार अंक्टाडच्या व्यासपीठावरून मांडण्यात आला. त्याला दुजोरा देताना मी आपल्या कायद्यातील या तरतुदी अशा कायद्यामध्ये जरूर अंतर्भूत असाव्यात, अशी आग्रही मागणी केली. आपल्या या मागणीला अगदी अमेरिकेतल्या प्रॉडक्ट सेफ्टी तज्ज्ञाने सुध्दा प्रत्यक्ष भेटून दाद दिली, हे सांगायला मला निश्चित आनंद वाटतो. ज्यावेळी प्रत्येक देशात प्रॉडक्ट सेफ्टी बद्दल कठोर कायदे होतील त्यावेळी ग्राहकांचा सुरक्षेचा अधिकार खऱ्या अर्थाने साकारला असं मी म्हणेन.

प्रश्न - UNGCP मधील सुधारणांचे पर्व तुमच्यापासून सुरू झाले. सुधारीत गाईडलाइनचे कोणते फायदे ग्राहकांना झाले, असे तुम्हाला वाटते?

या सुधारित गाईडलाईन्सची प्रभावी अंमलबजावणी आपण प्रस्तावित केलेल्या IGE मुळे देशोदेशी होऊ लागली, हा सर्वात मोठा फायदा. याची सुरुवात सुध्दा आपण आपल्या देशापासूनच केली आणि आपल्या सूचनेनुसार केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयाने २०१७ मध्ये सुधारित UNGCP साठी एक स्वतंत्र टास्क फोर्स स्थापन केला होता. अंक्टाडने गेल्या वर्षी प्रसिध्द केलेल्या जागतिक ग्राहक संरक्षण नकाशात देशोदेशीच्या ग्राहकांना यूएनजीसीपीचा कितपत फायदा झाला त्याचे स्पष्ट चित्र बघायला मिळते. मुख्य म्हणजे दर वर्षी होणाऱ्या या सभांमुळे देशादेशांतील शासकीय स्तरावर ग्राहक संरक्षणाच्या विविध क्षेत्रांत कालानुरूप धोरणे आखून त्यानुसार ठोस उपक्रम हाती

घेण्याबाबतची सजगता आणि सतर्कता वाढली असल्याचे आढळून येते.

प्रश्न - मुंबई ग्राहक पंचायतीची स्वयंपूर्णता, आपली वितरण व्यवस्था याबद्दल अनेकांना कायम अचंबा वाटतो. तो अनुभव याही वेळी आला का?

हो अर्थात. कन्झ्युमर्स इंटरनॅशनलने (CI) या परिषदे दरम्यान एक साईड इव्हेंट आयोजित केली होती. जगातील ग्राहक संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कंझ्युमर्स इंटरनॅशनलच्या डायरेक्टर जनरल हेलेना ल्युरेन्ट यांनी त्यांच्या सदस्य असलेल्या ग्राहक संस्थांना पुरेसं आर्थिक पाठबळ मिळत नसल्याने ग्राहक चळवळीची कामे होत नसल्याचे सांगितले. खुद्द कन्झ्युमर्स इंटरनॅशनलला सुध्दा बिकट आर्थिक परिस्थितीतून सध्या जावे लागत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई ग्राहक पंचायत आर्थिकदृष्ट्या कशामुळे आत्मनिर्भर आहे, हे सर्वांना सांगण्याची संधी मी उचलली. त्यामुळे बार्बाडोस या देशातील एका ग्राहक संस्थेने आपल्या वितरण व्यवस्थेबद्दल अधिक स्वारस्य दाखवले आहे.

प्रश्न - AI युगात ग्राहकांसमोर आणखी कोणती आव्हाने असतील? UN व्यासपीठावर त्याबद्दल काय मांडणी झाली?

"Safeguarding and empowering Consumers in the age of AI" या विषयावर अत्यंत माहितीपूर्ण असे एक सत्र या परिषदेत संपन्न झाले. विस्मयचकित करणाऱ्या आणि भयानक वेगाने फोफावणाऱ्या AI चे नियमन कोण आणि कसं करणार हा प्रश्न आज जगातील सर्वच तज्ज्ञांना भेडसावत आहे. AI ची विश्वासार्हता, AI मुळे ग्राहकांची होणारी फसवणूक आणि त्यापासून ग्राहकांचे संरक्षण कसे करायचे हे प्रश्नही आहेत. AI मुळे ग्राहकांचे आणि एकंदरीतच सर्व समाज घटकांचे फायदे होत असताना दिसले, सोयी, सुविधा, सुलभता या सर्व दिसत असल्या तरीही त्यामागे असलेली अलगोरिद्मीक यंत्रणा अनेक प्रश्न उपस्थित करत आहे. त्यामुळे ग्राहकांची अनेक ठिकाणी कळत नकळत फसवणूक होत आहे, होऊ शकते. त्याचबरोबर ग्राहकांचा राईट टू प्रायव्हसी हा हक्क अनेक प्रसंगी धाब्यावर बसवून AI तुमच्या आमच्या जीवनात प्रवेश करताना दिसत आहे. याच्यावर नियंत्रण कसे आणि कोण ठेवणार हा प्रश्न सर्वांना भेडसावत आहे. त्यामुळे अशा या चर्चेत प्रश्न अनेक, समस्या अनेक आणि उत्तरांसाठी सर्वजण धडपडत असतानाचे चित्र पहायला मिळाले. मात्र एक गोष्ट निश्चित की आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि तेही संयुक्त राष्ट्रांच्या स्तरावर AI मुळे ग्राहकांची सुरक्षितता धोक्यात आली असून त्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे, हे या निमित्ताने अधोरेखित झाले.

प्रश्न - जागतिक ग्राहक चळवळीतील एक महत्त्वाचे ग्राहक नेते अशी तुमची ओळख आहे. ग्राहक संरक्षण विषयक सध्याच्या या जागतिक बदलांचा वेग पुरेसा आणि प्रभावी ठरेल का? तुम्हाला काय वाटतं?

एक गोष्ट आपल्याला नेहमीच लक्षात ठेवली पाहिजे की ग्राहकांच्या संरक्षणासाठी असलेले कायदे आणि तंत्रज्ञानामुळे समाजात आणि बाजारपेठेत होणारे बदल आणि त्या अनुषंगाने त्याचा गैरफायदा घेऊन ग्राहकांची वेगवेगळ्या पध्दतीने होणारी फसवणूक यात नेहमीच तफावत राहणार आहे. आजकालचे तंत्रज्ञान ज्या झपाट्याने बदलत आहे तितक्या झपाट्याने आपले कायदे बदलू शकत नाहीत, हे वास्तव आपण स्वीकारणे आवश्यक आहे. परंतु त्याचबरोबर या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना त्याचे भान असणे आवश्यक आहे आणि त्यामुळे या कायद्यांची अंमलबजावणी करताना अशा यंत्रणांनी अत्यंत उदारमतवादी दृष्टिकोन स्वीकारून ग्राहकांच्या संरक्षणासाठी जर कायदे तोकडे पडत असतील तर तिथे या यंत्रणांनी कल्पकतेने कायद्याचा वापर करून ग्राहकांचे संरक्षण करून वेगवेगळ्या पध्दतीने ग्राहकांना कसे फसवले जात आहे त्याला प्रतिबंध करण्याचा कसोशीने प्रयत्न करायला हवा. एका गोष्टीचे मला निश्चित समाधान आहे की आपण संयुक्त राष्ट्रांच्या स्तरावर जी 'Inter government Group of Experts - IGE,' ही कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण केली, ती अशा बदलत्या तंत्रज्ञानाचा वेध गेली नऊ वर्ष सातत्याने घेत आलेली आहे आणि यापुढेही घेत राहणार आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर आणि त्या अनुषंगाने संयुक्त राष्ट्रांच्या प्रत्येक सदस्य देशात ग्राहक संरक्षणाच्या दृष्टीने बदलत्या कालानुरूप ग्राहक संरक्षणासाठी आवश्यक ती पावले वेळच्यावेळी उचलली जातील, असा मला विश्वास आहे.

‘१००%’ वाचा! चुकवू नका!!

– नेहा जोशी

अलिकडे आपण असे बघतो की काही खाद्यपदार्थांच्या पॅकवर ‘१००% Whole Wheat’, ‘१००% फ्रूट ज्यूस’ असे लिहिलेले असते. पण हे दावे फसवे असतात. प्रत्यक्षात त्या खाद्यपदार्थांत इतर अनेक घटक असते. फ्रूट ज्यूसमध्ये पाणी, साखर, प्रिझर्वेटिव्ह इ. घटक असतात. मग १००% फ्रूट ज्यूस कसा असेल त्यात? म्हणून भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (FSSAI) वेष्टण (पॅकेज्ड) अन्नपदार्थ लेबल्सवर आणि त्यांच्या जाहिरात आणि प्रचार माध्यमांमध्ये १००% असा शब्दप्रयोग करण्यास बंदी घातली आहे. FSSAI ने असे नमूद केले आहे की १००% असा शब्द इतर विशेषणांसह वापरल्यास ग्राहकांमध्ये ते उत्पादन उत्कृष्ट असल्याचा आभास निर्माण करू शकतो. त्यामुळे ग्राहकांची दिशाभूल होऊ शकते. तसेच इतर प्रामाणिक उत्पादकांसाठी ते अन्यायकारक ठरते.

कुठलाही अन्नपदार्थ १००% असू शकत नाही. साधे लिंबू सरबत पण लिंबू, पाणी, साखर, मीठ इ. घटकांनी बनते. अगदी बाटलीबंद पिण्याच्या पाण्यात देखील कॅल्शियम, मॅग्नेशियम अंशतः प्रमाणात असतात. तुम्ही जर फ्रूट ज्यूसच्या पॅकवरील घटकपदार्थ बघितले तर त्यावर पाणी असा पहिल्या क्रमांकाचा घटकपदार्थ असतो. ह्याचा अर्थ त्या फ्रूट ज्यूसमध्ये सगळ्यात जास्त प्रमाणात पाणी आहे. मग असते ते फ्रूट कॉन्सन्ट्रेट. त्यामुळेच तो फ्रूट ज्यूस १००% फ्रूट ज्यूस असा असू शकत नाही. त्याबरोबरीने अन्नपदार्थामध्ये साखर, मीठ घातलेले असते. असे पदार्थ मधुमेही, रक्तदाब असलेल्या व्यक्तींना चालत नाहीत. तसेच अन्नपदार्थांच्या पॅकवर Servings म्हणजेच तो पदार्थ एकावेळी किती खावा असे लिहिलेले असते. जेणेकरून योग्य प्रमाणात पदार्थ खाल्ल्याने आपल्या आरोग्यास काही अपाय होणार नाही. म्हणूनच पॅकेजवर योग्य माहिती असावी पण अतिशयोक्ती नसावी.

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण (FSSAI) सारखी सरकारी आस्थापने ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी तसेच ग्राहकांच्या माहितीचा आणि निवडीचा अधिकार अबाधित राहावा म्हणून अनेक नियमावली बनवत असतात. सजग, चाणाक्ष ग्राहक म्हणून अन्न पदार्थाच्या वेष्टणावरील माहिती वाचणे त्याचा अर्थ, त्यासंबंधित नियम समजून घेऊन उमजून खरेदी आणि सेवन करणे हीच खरी आपल्या सर्वांसाठी आरोग्याची गुरुकिल्ली! तसेच कृतिशील ग्राहक म्हणून अन्न पदार्थाच्या वेष्टणावर काही उणे आढळेच तर FSSAI च्या अधिकृत पोर्टल **helpdesk-foscos@fssai.gov.in** वर जाऊन तक्रार करावी.

पर्यावरणपूरक उत्सव

– जयश्री वानखेडे

मुंबई ग्राहक पंचायत, ठाणे विभागातर्फे ५ जून जागतिक पर्यावरण दिनाचं औचित्य साधत, माझीदुन शाळा, ऐरोली येथे २७ जून रोजी ‘पर्यावरणपूरक उत्सव’ या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. मुंबई ग्राहक पंचायत ठाणे विभागाच्या अध्यक्षा मीनलताई टिपणीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. या उपक्रमात इयत्ता सातवी आणि आठवीचे मिळून ३० विद्यार्थी सहभागी झाले होते. जयश्री वानखेडे यांनी सुरुवातीला पर्यावरणाचे महत्त्व समजावून सांगितले, त्यांना चित्रकलेच्या शिक्षकांनी उत्तम सहकार्य केले. विद्यार्थ्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. पर्यावरणाचे रक्षण करण्याबाबतचे संस्कार शालेय जीवनात घडावे, हे उद्दिष्ट ठेवून आखलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी छान प्रतिसाद दिला. ठाणे विभागाने चित्रकलेसाठी लागणारे साहित्य पुरवले.

स्मार्ट फोन स्मार्टली कसा वापराल?

– चित्रा जोशी, कार्यवाह, मालाड विभाग

संस्थेच्या स्थापनेचा उद्देश आणि कार्याविषयी माहिती देतांना नेहा जोशी

मालाड विभागाने, महेंद्र नगर मालाड पूर्व येथील कम्युनिटी हॉलमध्ये २१ जून रोजी प्रा. हेमंत सामंत यांचे 'सायबर सिक्युरिटी' या विषयावर भाषण आयोजित केले होते. महेंद्र नगर सोसायटीचे सेक्रेटरी अमित कब्रे यांच्या प्रस्ताविकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मुंबई ग्राहक पंचायतीच्या स्थापनेचा उद्देश आणि कार्य या विषयी माहिती नेहा जोशी यांनी सांगितली. महेंद्र नगरमधील ज्येष्ठ सभासद उषाताई चिटणीस यांच्या हस्ते प्रा. हेमंत सामंत यांचे फळांची परडी देऊन स्वागत केले गेले तर चित्रा जोशी यांनी, त्यांची ओळख करून दिली. प्रा. हेमंत सामंत यांनी स्मार्ट मोबाईल स्मार्टली कसा वापरावा, कशी काळजी घ्यावी, याची अतिशय उपयुक्त आणि महत्त्वाची माहिती दिली.

- गरज नसेल तेव्हा मोबाईलचे नेट बंद करावे, त्यामुळे तुम्ही कुठे आहात ही माहिती नको त्या व्यक्तीपर्यंत पोचत नाही.
- सार्वजनिक ठिकाणी मोबाईल चार्ज करू नका.
- मोबाईल सुरक्षित राहण्यासाठी त्यात ॲण्टी व्हायरस असावा.
- बाहेरगावी हॉटेलात राहिल्यावर स्मार्ट टी.व्ही.चे कनेक्शन बंद करून ठेवावे.

अशा महत्त्वपूर्ण गोष्टी त्यांनी सांगितल्या.

मुंबई ग्राहक पंचायतीच्या उपक्रमांविषयी माहिती देऊन तसेच त्या उपक्रमात सहभागी होण्याची विनंती करून तृप्ती करंदीकर यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. सर्वांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. कार्याध्यक्ष भाग्यश्री सामंत, खजिनदार शानबाग, कार्यकर्त्या कविता टिकम, अरविंद स्वार आणि गोरेगाव विभागाचे पराग रेडकर उपस्थित होते.

सांताक्रूझमध्ये योग दिन साजरा

– वृषाली ठवाळ, कार्यवाह, सांताक्रूझ विभाग

योग दिनानिमित्त श्री अंबिका योगाश्रम ठाणे (सांताक्रूझ विभाग) यांच्या संचालिका व शिक्षिका यांचा 'योग कर्मसु कौशल्यम्' हा कार्यक्रम २१ जून रोजी सांताक्रूझ महिला मंडळ येथे आयोजित केला होता.

या कार्यक्रमासाठी श्री अंबिका योगाश्रम सांताक्रूझ शाळेच्या संचालिका श्रध्दा नानल, शिक्षिका यशोदा बंगेरा, रमणी राय, मनिषा चव्हाण, विनिता सरफरे, सारिका महामुनी व सेजल मुरचुवडेकर उपस्थित होत्या. सांताक्रूझ विभागाच्या कार्यवाह वृषाली ठवाळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

विभागात संघटन विभागातर्फे 'पर्यावरणप्रिय गणेश उत्सव २०२५' हा उपक्रम राबविला जाणार आहे, याची सविस्तर माहिती दिली. तसेच उपस्थित सभासदांना व संघप्रमुखांना NACH बद्दल माहिती दिली. स्मिता डोईफोडे यांनी श्री अंबिका योगाश्रम या संस्थेचा परिचय सर्वांना करून दिला.

सर्वप्रथम योगसाधकांनी प्रार्थना करून कार्यक्रमाला सुरुवात केली. २१ जून, आंतरराष्ट्रीय योग दिन कसा व केव्हापासून साजरा केला जाऊ लागला यांची माहिती संचालिका श्रध्दा नानल यांनी दिली. श्रध्दा नानल यांनी उपस्थितांकडून काही योगासने करून घेतली. विवेक ठवाळ यांनी आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमासाठी ३५ सभासद उपस्थित होते.

श्री अंबिका योगाश्रमच्या संचालिका व शिक्षिकांसमवेत सांताक्रूझ विभागाचे कार्यकर्ते

बँकेतील मुदत ठेवींचा पुरेपूर वापर कसा कराल?

– अभय दातार

बचत खात्यावर मिळणारे व्याज अगदी तटपुंजे असते. त्यामुळे साहजिकच आपण जमेल तशी रक्कम मुदत ठेवींत ठेवत असतो. मुदत ठेव ही अगदी जुनी संकल्पना आहे. आपल्या घरातील रोख रक्कम आणि बँकेच्या बचत खात्यात असलेली शिल्लक यानंतर सगळ्यात जास्ती तरलता कशात असेल, तर ती बँकांच्या मुदत ठेवींमध्ये. वेळ कधी सांगून येत नाही. त्यामुळे अचानक जास्ती रकमेची गरज पडली तर बँक मुदत ठेव ही अशी गुंतवणूक आहे की जी केव्हाही मोडता येते. मात्र अशा वेळी बँका काही व्याज कापून देतात. सर्वसाधारणपणे मुदत ठेव बँकेकडे जितका काळ राहिली त्या काळासाठी जे व्याज असते त्याच्यापेक्षा १% कमी व्याज आकारून ही ठेव परत केली जाते. काही मुदत ठेवी करबचतीसाठी असतात, तर काही रु. एक कोटी किंवा अधिक रकमांच्या ठेवी मुदतीपूर्वी मोडता येत नाहीत. परंतु अडीअडचणीच्या वेळी मुदत ठेव मोडणे हा एकच मार्ग नाही; इतरही काही सोपे मार्ग आहेत, ते पाहूया.

आपली गरज थोड्या काळापुरती आणि निश्चित रकमेची असेल, तर बँक आपल्या मुदत ठेवीवर मुद्दलाच्या ९०% पर्यंत कर्ज देते. ठेवीवर मिळणारे वार्षिक व्याज जर ७% असेल, तर कर्जावर १% अधिक, म्हणजे ८% वार्षिक व्याज आकारले जाते. जसजशी कर्जाची परतफेड होईल, तसतशी व्याजाची रक्कमही कमी होत जाते. ते जमत नसेल, तर जे व्याज लागेल ते भरावे लागते आणि जेव्हा मुदत ठेव देय होईल, तेव्हा त्या रकमेतून कर्जाची रक्कम वळती केली जाते व उर्वरीत रक्कम आपल्या खात्यात जमा होते.
आणखी एक पर्याय ओव्हरड्राफ्टचा आहे. जर आपली गरज नक्की किती असेल आणि ती किती काळासाठी असेल ते निश्चित नसेल, तर मुदत ठेवींवर ९०% पर्यंत ओव्हरड्राफ्ट खाते उघडता येते. व्याजाचा दर वर सांगितल्याप्रमाणेच असतो. या खात्यासाठी चेकबुक सुध्दा मिळते आणि गरजेनुसार रक्कम काढता व जमा करता येते. जे व्याज लागते ते फक्त वापरलेल्या रकमेवर.
वरील दोन्ही प्रकारांत ठेवीदाराला काही कागदपत्रांवर सह्या कराव्या लागतात आणि ठेव पावती बँकेकडे जमा करावी लागते. या पावतीवर बँक lien म्हणून एक प्रकारचा बोजा चढवते. कर्जाची परतफेड केल्यावर ही पावती ठेवीदाराला परत देण्यात येते. जर मुदत ठेव एकाहून अधिक नावांवर असेल, तर सर्वांना कागदपत्रांवर सह्या कराव्या लागतात. कोणत्याही बँकेचा आपल्या ठेवीवर पहिला हक्क असतो, त्यामुळे सहसा दुसऱ्या बँकांच्या मुदत ठेवींवर अशी कर्जे दिली जात नाहीत.

आणखी एक सोपा मार्ग आहे, तो म्हणजे स्वीप इन सुविधा. हिच्याद्वारे आपल्या मुदत ठेवी बचत खात्याशी जोडल्या जातात. आपल्याला काही रकमेची गरज आहे, पण बचत खात्यात तितकी शिल्लक नाही. अशा वेळी ही सुविधा असेल, तर जोडलेल्या मुदत ठेवींपैकी आवश्यक तेवढी रक्कम ठेवींमधून काढली जाऊन बचत खात्यात जमा होते आणि आपली गरज भागते. या ठेवी रु. १,०००/- च्या युनिट्समध्ये विभागल्या असतात आणि बँकिंग प्रणालीद्वारे आवश्यक तेवढीच युनिट्स मोडली जातात. उदाहरणार्थ, बचत खात्यात रु. २५,७९६/- शिल्लक आहे आणि या खात्याशी जोडलेल्या वेगवेगळ्या मुदत ठेवींची रक्कम रु. १० लाख आहे. समजा मला रु. १ लाखाची गरज आहे, पण बचत खात्यात रु. ७४,२०४/- इतकी रक्कम कमी पडते आहे. अशा वेळी अगदी अलीकडे उघडलेली आणि या खात्याला जोडली गेलेली मुदत ठेव रु. १,०००/- चे एक युनिट, अशा ७५ युनिट्समध्ये मोडली जाईल आणि ते पैसे माझ्या बचत खात्यात जमा होतील. या ठेवीत तितकी युनिट्स उपलब्ध नसतील, तर पूर्ण ठेव मोडली जाऊन त्यानंतरची ठेव आवश्यक तितक्या युनिट्समध्ये मोडली जाईल. या ठेवींची मुदत आणि प्रती युनिट रक्कम याबद्दल वेगवेगळ्या बँकांचे वेगवेगळे नियम आहेत, पण मूळ पध्दत सारखीच आहे.

बहुतेक सर्व बँका आता स्वीप इन – स्वीप आउट सुविधा देतात. आपण वर जी पध्दत पाहिली तिला स्वीप इन म्हणतात. आपल्या

बचत खात्यातील शिल्लक जेव्हा एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्ती होते, तेव्हा ती रक्कम आपोआप ठराविक युनिट्सच्या मुदत ठेवीत गुंतवली जाते. ही स्वीप आउट सुविधा होय. या मुदत ठेवींवर इतर ठेवींप्रमाणेच व्याज मिळते.

आपल्या बँकेत जाऊन याविषयी अधिक माहिती जाणून घ्या आणि या सुविधेचा अवश्य लाभ घ्या; मात्र कोणत्याही कागदपत्रावर सही करण्याआधी बँकेचे सर्व नियम नीट समजावून घ्या. या कागदपत्रांची एक प्रत स्वत:कडे ठेवा.

वाचकहो, ‘दाव्याविना पडून राहिलेल्या ठेवी’ यासंबंधीचा मागच्या अंकातील लेख आपल्याला माहितीपूर्ण वाटला असेल असे वाटते. तर मग...

- तुम्ही तुमच्या सर्व आर्थिक नोंदी तपासून पाहिल्या का? दावा केली न गेलेली एखादी गोष्ट तुम्हाला आढळली का?
- ‘DEAF’ ही संकल्पना तुम्हाला समजली का?
- मागच्या अंकातील या लेखाबद्दल तुम्ही तुमच्या नातेवाईकांना, मित्रांना माहिती दिलीत का? त्यांच्या अशा काही ठेवी दाव्याविना पडून राहिल्या असतील, तर त्या शोधण्यासाठी तुम्ही त्यांना मदत केली का?

ग्राहक पंचायत पेठांना नक्की या!

ग्राहक पंचायत पेठेच्या महत्त्वाच्या तिसऱ्या टप्प्याला सप्टेंबर २०२५ पासून सुरू होणाऱ्या दादर येथील पंचायत पेठेपासून सुरुवात होत आहे. ग्राहक पंचायत पेठेचे हे ४७ वे वर्ष! दरवर्षी अधिकाधिक उत्साहाने नवनवीन कल्पनांनी, नवनवीन उत्पादने घेऊन ह्या पंचायत पेठेचे आयोजन होत आहे. (ऑगस्ट आणि सप्टेंबर हे दोन महिने म्हणजे सणावारांची लयलूट) सप्टेंबर महिन्यातील गणपती बाप्पांचे आगमन झाल्यानंतर बाप्पाला निरोप दिला की लगेचच **दादर येथे ०९ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर २०२५** ह्या कालावधीत सूर्यवंशी क्षत्रिय हॉलमध्ये ही पंचायत पेठ आयोजित करण्यात आली आहे.

बाजारपेठेतील उचित प्रथांचा आग्रह धरत, ग्राहकांना गृहित न धरता त्यांच्या पैशाचा योग्य मोबदला देऊन उत्तम व्यवहार साधणे हे ग्राहक पंचायत पेठेचे वैशिष्ट्य. ग्राहक जागृतीचा हा अनोखा मंच! इथे केवळ खरेदी-विक्रीचा व्यवहार नाही तर सुजाण ग्राहकत्वाचे प्रतिबिंब आपणास दिसेल. सर्वच पंचायत पेठांचे स्वागत आपल्यासारखे अत्यंत समजदार, चोखंदळ ग्राहक करतीलच याची आम्हाला खात्री आहे. या सर्व ग्राहक पंचायत पेठांचे आयोजन हे ‘मुंबई ग्राहक पंचायत’ ह्या स्वयंसेवी ग्राहक संस्थेतर्फे होत आहे, ज्या संस्थेचा हा उपक्रम UNच्या वेबसाईटवर कायमस्वरूपी विराजमान झालेला आहे. इथे फसवणुकीला वाव नाही. ग्राहक जागृतीला मान आहे. सर्वच पेठांसाठी आपल्या सर्व ग्राहकांना पंचायत पेठ समितीतर्फे आग्रहाचे निमंत्रण. नक्की या! भेटा. खरेदी करा आणि ह्या खरेदी उत्सवाचा आनंद घ्या.

ग्राहक पंचायत पेठ दालन तक्ता – २०२५-२६

क्र.	स्टॉलचे नाव	वैशिष्ट्ये	दादर	ठाणे	अंधेरी
१.	दिनेह कलेक्शन	सिको, गढवाल पैठणी, कॉटन इ. ५/९ वार साड्या	✓	✓	✗
२.	युनिक कलेक्शन	कांजीवरम, बनारसी, सिल्क, पटोला, गढवाल इ.	✓	✗	✗
३.	राजू एम्ब्रॉयडरी वर्क	आसाम, कलकत्ता, टसर सिल्क सारीज व ड्रेस मटेरिअल	✓	✓	✓
४.	श्री सिल्क	कांजीवरम, सिल्क सारीज	✓	✓	✗
५.	अथर्व कलेक्शन	जामदानी, महेश्वरी साड्या, रेडिमेड ब्लाऊज	✓	✓	✗
६.	वित्ताशी एंटरप्रायझेस	हॅण्ड ब्लॉक, अजरख प्रिंट साड्या, ड्रेस मटेरिअल	✓	✓	✓
७.	सोलरॅप	इरकल, कॉटन सिल्क, संबलपुरी, कशिदा वर्क, कॉटन साड्या इ.	✗	✗	✓
८.	नवलाई क्रिएशन्स	चंदेरी, महेश्वरी, इक्कत, अजरख, हँडब्लॉक साड्या	✗	✓	✓
९.	एस एस फॅशन	जयपूर कॉटन, कलमकारी, मटका सिल्क, कोसा सिल्क साड्या	✓	✗	✓
१०.	शुभ्रा कलेक्शन	साड्या आणि रेडीमेड ब्लाऊज	✓	✓	✓
११.	सिमरन कलेक्शन	प्लाझो सेट, डिझाईनर कॉटन, रेयॉन कुर्तीज	✓	✓	✓
१२.	सारा कलेक्शन्स	रेडीमेड कुर्तीज, प्लाझो, दुपट्टे इ.	✗	✗	✓
१३.	मोहक क्रिएशन्स	फॅन्सी कुर्तीज, कलमकारी, इक्कत रेडिमेड कुर्तीज	✓	✓	✗
१४.	एम ॲण्ड एम्स एक्सक्लुझिव्ह	शॅडो वर्क हँड एम्ब्रॉयडरी कुर्ती, टॉपस्, साड्या	✓	✗	✓
१५.	नारी बुटिक	शॉर्ट ॲण्ड लाँग कुर्तीज, पुरुष व स्त्रियांसाठी शर्टस्	✗	✓	✓
१६.	स्पर्श क्रिएशन्स	सर्व प्रकारच्या लखनवी कुर्ती, पटियाला, प्लाझो, दुपट्टे इ.	✓	✗	✗
१७.	वल्लरी फॅशन डिझाइनर	डेनिमचे स्त्रिया, पुरुष व मुलांसाठीचे कपडे	✓	✓	✓
१८.	मयुरा कलेक्शन	शॉर्ट टॉप, स्लिव्हलेस टॉप, वनपीस स्पॅगेटी इ.	✗	✓	✓
१९.	रोतीक कलेक्शन	शॉर्ट, ट्युनिक शॉर्टस्, लेडीज शर्ट, जॅकेट	✗	✓	✗
२०.	व्होवन थ्रेड (लिमाया)	कॉटन मल कॉटन ड्रेस मटेरिअल आणि कुर्ती, पॅन्टस्	✗	✗	✓
२१.	आभा एथनिक वेअर	लाँग, शॉर्ट कुर्तीज्, वनपिस, लेडीज शर्ट, स्कर्ट	✓	✗	✗
२२.	श्रीजा एंटरप्रायझेस	विविध कुर्तीज, कॉर्ड सेटस्	✓	✗	✓
२३.	शितल क्रिएशन	कॉटन कुर्ती, शॉर्ट टॉप, शर्ट, वनपिस, जॅकेट	✓	✗	✗
२४.	स्वामिनी कॉटन हब	कोरा कॉटन, वनपिस, शॉर्ट ॲण्ड लाँग कुर्ती	✓	✗	✗
२५.	मृणाक्षी लखनवी	कॉटन, मोडाल, चंदेरी, जॉर्जेट, मसलीन लखनवी कुर्तीज	✗	✓	✓
२६.	राधा फॅशन्स	बाटिक, इक्कत, बांधणी, चंदेरी ड्रेस मटेरिअल	✓	✓	✓
२७.	अनुराधाज् कलेक्शन	महेश्वरी, प्युअर सिल्क, कॉटन ड्रेस मटेरिअल	✓	✓	✓
२८.	अन्वीषा कलेक्शन्स	लखनवी ड्रेस मटेरिअल	✗	✓	✓
२९.	साशा कलेक्शन्स	जयपूर कॉटन, खादी कॉटन, हॅण्ड वर्क, बाटिक	✓	✓	✗
३०.	स्वस्तिक होजिअरी	लेडीज अंडरगार्मेंटस्	✓	✓	✓
३१.	लुक ॲट मी	सर्व वयोगटासाठी नाईट सूटस्	✓	✓	✓
३२.	मायलेकी	बाटिक, जयपूर गाऊन्स इ.	✓	✓	✓
३३.	प्रीती गार्मेंटस्	दर्जेदार गाऊन्स, फिडिंग गाऊन्स, नाईट ड्रेस इ.	✓	✓	✓

क्र.	स्टॉलचे नाव	वैशिष्ट्ये	दादर	ठाणे	अंधेरी
३४.	सोहानी क्रिएशन	विविध डिझाइन्सचे गाऊन्स	✓	✕	✕
३५.	लक्ष्मी वल्लभ कलेक्शन	विविध रंगाचे परकर आणि गाऊन्स	✕	✓	✕
३६.	पिपा क्रिएशन	फॅन्सी ब्लाऊज, स्कर्टस् इ.	✓	✓	✓
३७.	ड्रिम्झ कलेक्शन	रेडीमेड ब्लाऊज	✕	✓	✕
३८.	डी.टी.निटवेअर	बनियन्स, ट्रॅकसूट, टी शर्टस्, सॉक्स इ.	✓	✓	✓
३९.	निओ गार्मेंटस्	लहान-मोठ्यांचे टी शर्टस्, होजिअरी ट्रॅक सूटस् इ.	✕	✕	✓
४०.	भारतीय खादी सेंटर	लेंगे, झब्बे, शर्टस्, पंचे, हातरुमाल, जॅकेटस् इ.	✓	✓	✓
४१.	ब्लिस टी शर्टस्	प्रिन्टेड टी शर्टस्	✓	✓	✓
४२.	अतरंगी मराठी टीशर्ट	मराठी कॅलीग्राफिक टीशर्टस्	✓	✓	✓
४३.	अर्मियास (Men's wear)	कॉटन शर्ट, टी शर्टस्, बॉक्सर शॉर्टस्, ट्राऊझर्स इ.	✓	✓	✓
४४.	महाटेक्स	टॉवेल, सतरंज्या, दोहर, चादरी इ.	✓	✕	✕
४५.	जयपूर हँडलूम	बेडशिट, रजया, कुर्तीज इ.	✓	✓	✓
४६.	नागपूर स्पेशल	बेडशीट, डोअर मॅट, टेबल क्लॉथ, पिलो कव्हर्स	✕	✓	✓
४७.	ब्लॉक्स ॲण्ड बाटिक्स्	ब्लॉक प्रिंट/बाटिक बेडशीटस्, कुशन कव्हर्स इ.	✓	✕	✓
४८.	आभा कलेक्शन्स	हॅण्ड ॲप्लीक, हॅण्ड एम्ब्रॉयडरी बेडशीट्स	✕	✓	✕
४९.	आरवली कलेक्शन	कॉटन, ब्लॉक प्रिंट, जयपूरी बेडशीट्स	✕	✓	✕
५०.	पुलगम सोलापूर चादरी	चादरी, पंचे, गालीचा, दोहर, बेडशीटस् इ.	✕	✓	✕
५१.	पल्लवी कव्हर्स	सोफा/फ्रीज हँडल/फ्रीज टॉप/मिक्सर/साडी कव्हर्स इ.	✓	✓	✓
५२.	निद्रा क्रिएशन्स-सुजलाम सुफलाम	मेंढीच्या लोकरीपासून बनवलेल्या गाद्या	✕	✓	✓
५३.	अहिल्या महिला मंडळ	मलमलच्या गोधड्या, बाळंतविडा व बाळाचे कपडे	✓	✓	✕
५४.	ऊब प्रकल्प	हातांनी शिवलेल्या गोधड्या, पायपुसणे इ.	✓	✕	✕
५५.	मल्हार क्रिएशन्स	बाळाचे कपडे, दुपटी, टोपी, लहान मुलांचे कपडे इ.	✓	✕	✓
५६.	अद्विका किड्स फॅशन	लहान मुलींचे फ्रॉक्स, नाईट सूट इ.	✕	✓	✕
५७.	द लिटील स्टिच	लहान मुलांचे कपडे	✓	✕	✕
५८.	दुलार-इसेन्स ऑफ मदरहूड	बाळंतविडा, कॉटन फ्रॉक, कॉटन शर्ट, नाईट सूट	✕	✓	✕
५९.	अर्थिता बॅग्ज्	विविध प्रकारच्या ऑर्गनायझर्स/बॅग्ज	✓	✓	✕
६०.	दिया क्विल्ट्स	विविध प्रकारचे ऑर्गनायझर्स	✕	✕	✓
६१.	विकास लेदर वर्क्स	लेदर पर्सेस, पाऊच, लेदर जॅकेट, बेल्ट इ.	✓	✓	✓
६२.	उद्यमिता	महिला बचत गटांनी बनवलेल्या पर्सेस, फोल्डर्स इ.	✓	✕	✕
६३.	एस ॲण्ड एस बॅग्ज्	फॅन्सी बॅग्ज, पर्सेस इ.	✓	✓	✓
६४.	शिवम् बॅग्ज	डेनिम बॅग्ज	✓	✕	✕
६५.	स्वरुपम कलेक्शन	डिझाईनर बॅग्ज, प्रवासी बॅग, पर्सेस	✕	✕	✓
६६.	पॅकेम्	वॉलेट्स, टोट बॅग्ज, डेनिम टोट बॅग्ज	✓	✓	✕
६७.	प्रयोग क्रिएशन्स	हॅण्ड पेंटेड बॅग्ज, पर्सेस, पाऊच इ.	✓	✕	✕





क्र.	स्टॉलचे नाव	वैशिष्ट्ये	दादर	ठाणे	अंधेरी
६८.	आरतीज्	हॅण्डपेंटेड बॅग, स्लिंग, लॅपटॉप, कॅनव्हास बॅग, बटवे	✕	✓	✕
६९.	श्री महालक्ष्मी आर्टस्	पारंपरिक व ॲण्टिक ज्वेलरी	✓	✕	✓
७०.	ट्रॅडिशनल ऑर्नामेंटस्	इमिटेशन ज्वेलरी, आर्टिफिशल ज्वेलरी इ.	✕	✓	✕
७१.	स्वप्नालंकार	इमिटेशन ज्वेलरी आणि मोत्यांचे दागिने	✓	✓	✓
७२.	आर्ट इन संस्कृती	सेमी प्रेशिअस स्टोन, ग्लास बीड्स ज्वेलरी	✓	✓	✕
७३.	फॅशन क्युरा ज्वेलरी	टेरा-कोटा ज्वेलरी	✕	✓	✓
७४.	रसिका अलंकार	मायक्रो गोल्ड प्लेटेड व इतर ज्वेलरी	✕	✕	✓
७५.	स्वाती क्रिएशन्स	डिझायनर इमिटेशन ज्वेलरी	✕	✓	✕
७६.	पलाश ज्वेलरी	सिल्व्हर व प्रेशियस स्टोन्स ज्वेलरी	✓	✕	✕
७७.	अनुयोग इन्सेंस	विविध प्रकारची अत्तरे, सुगंधी अगरबत्ती	✕	✓	✓
७८.	ब्लॉसम अ‍ॅण्ड इन्सेंस	परफ्यूम्स	✓	✓	✓
७९.	हर्बारिओ कॉस्मेटीक्स	सौंदर्य प्रसाधने (हेअर, स्किन केअर)	✓	✓	✕
८०.	युथोपिया (बरवा)	गायीच्या तूपापासूनच्या लिपस्टीक, फाऊंडेशन क्रीम	✓	✓	✓
८१.	झासा ग्लास आर्टिफॅक्टस्	काचेचे दिवे, पूजा सेटस्, अत्तरदाणी इ.	✓	✕	✕
८२.	हरि ओम वुड वर्क्स	लाकडाच्या वस्तू, फायबर मूर्ती, देव्हारे, पाट	✕	✕	✓
८३.	एन्थु फॉर आर्ट	कॅनव्हॉस फ्रेम, लाकडी टेबल टॉप, फ्रीज मॅगनेट्स	✓	✕	✓
८४.	कलात्मक	ज्यूटच्या विविध वस्तू, टी कोस्टर्स इ.	✓	✓	✕
८५.	देसाई आर्टस्	मातीच्या आकर्षक वस्तू	✓	✓	✕
८६.	अखंडज्योत	टाळ, घंटी, झांज, पुजेचे साहित्य इ.	✓	✓	✓
८७.	दीपक रंगोली	विविध डिझाईनचे रांगोळीचे साचे	✕	✓	✓
८८.	सांची आर्टस्	हॅण्डक्राफ्टेड विविध वस्तू	✓	✓	✓
८९.	निर्मिती एंटरप्रायझेस	काच व पाइनवुड – संमिश्र उत्पादने	✕	✓	✕
९०.	जान्हवी आर्टस	फ्रिज मॅगनेट्स	✕	✕	✓
९१.	श्री सिध्दीविनायक	दीपमाळा/अगरबत्ती इ.	✕	✓	✕
९२.	नेचर्स वूड	सावंतवाडी स्पेशल लाकडी खेळणी इ.	✓	✓	✓
९३.	योटॉईज	कापडी खेळणी	✕	✓	✕
९४.	शीलाताई फूड प्रॉडक्टस्	लोणचे आणि जॅम	✓	✓	✓
९५.	पोशिंदा न्यूट्रिशनल प्रॉ.	सर्व प्रकारचे मध-सूर्यफूल, बाभुळ इ.	✓	✓	✕
९६.	कर्णिक कृषी उद्योग	गुलकंद, हार्टिका, शेजवान चटणी इ.	✓	✓	✕
९७.	हनीबंस	सर्व प्रकारचे मध	✕	✕	✓
९८.	श्री विनायक एंटरप्रायझेस	घरगुती सफाईचे विविध ब्रश	✓	✓	✓
९९.	विनय एंटरप्रायझेस	किचनमधील विविध गृहोपयोगी स्टॅण्डस् होल्डर इ.	✓	✓	✓
१००.	ओमकार मार्केटींग	हार्ड ॲनोडाइज्ड किचन वेअर्स, (बिडाची) भांडी	✓	✓	✓
१०१.	गेबी क्लिनिंग	साफ सफाईची उत्पादने	✓	✓	✓

क्र.	स्टॉलचे नाव	वैशिष्ट्ये	दादर	ठाणे	अंधेरी
१०२.	एस.के. एंटरप्रायझेस	फोल्डिंग टेबल्स	✓	✓	✓
१०३.	महालक्ष्मी एंटरप्रायझेस	किचन वेअर्स	✓	✓	✓
१०४.	वंश गार्डन इनोव्हेटीव्हज्	फोल्डींग चटया, फोल्डींग वेताचे पडदे	✓	✓	✓
१०५.	चेतना एंटरप्रायझेस	गृहोपयोगी स्टीलची भांडी, थर्मास इ.	✗	✓	✗
१०६.	महावीर ट्रेडर्स	क्रोकरी, बनियन, मोजे इ.	✓	✓	✓
१०७.	स्पायका होम ॲण्ड हायजिन	विविध प्रकारची स्वच्छके	✓	✓	✓
१०८.	दिप्रा कॉस्मेटिक्स प्रा. लि.	विविध प्रकारचे शॅम्पू, सौंदर्य प्रसाधने	✓	✗	✓
१०९.	तुकाझ एक्सपोर्ट (संतोष मोरे)	पादत्राणे (माथेरान चप्पल)	✗	✗	✓
११०.	माथेरान चप्पल (राजू मोरे)	स्त्री-पुरुषांची पादत्राणे	✗	✓	✗
१११.	स्टेप इन वॉक शूज	विविध डिझाईन्सच्या चप्पलस्, सॅडल्स, शूज इ.	✓	✗	✗
११२.	एस.व्ही.आर.आर. ताडदेव	दिव्यांग मुलांनी बनविलेली उत्पादने	✓	✗	✗
११३.	शांतीवन	पंचे, सतरंज्या, दऱ्या	✗	✓	✗
११४.	विश्वास	कंदील	✗	✓	✗

सेतू बांधा रे

उपक्रमाचे हे तिसरे वर्ष

या विशेष पंचायत पेठेचे आयोजन २६ ते २८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत अंधेरी (पूर्व) येथील विजय नगर गृहसंकुल जवळच्या 'सिंफनी बँक्वेट हॉल', सहार रोड येथे करण्यात येत आहे.

समाजातील वंचित घटकांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्था ह्या उपक्रमात सहभागी होत आहेत. ह्या संस्थांतील मुलांनी केलेल्या उत्पादनांना ह्या विशेष पेठेत व्यासपीठ देण्यात येत आहे.

जवळजवळ ३० संस्था ह्या उपक्रमांत सहभागी होत आहेत. मतिमंद, अपंग, अंध, आदिवासी ह्यांसारख्या वर्गांसाठी काम करणाऱ्या ह्या संस्था अशा वर्गाला आत्मनिर्भर करण्यासाठी, त्यांच्यात आत्मविश्वास जागृत करण्यासाठी धडपडत आहेत. त्यांच्या या प्रयत्नांना आपल्या सारख्या सुरक्षित जगात वावरणाऱ्यांनी मनःपूर्वक साथ देणे आवश्यक आहे. दिवाळी जवळ येतेय. आपल्याला अशा वंचितांच्या काळोख्या आयुष्यात एक छोटीशी पणती लावायची आहे. ह्या पंचायत पेठेला भेट देऊन इथे असणारी उत्पादने, पणत्या, आकाश कंदील, तोरणे, बॅगा इ. खरेदी इथूनच करण्याचे आवाहन आम्ही करत आहोत.

या विशेष पेठेचा भरपूर प्रचार-प्रसार करा, खरेदी करा, खूप खूप उत्साहाने ही मुले त्यांच्या यथाशक्ती सामर्थ्याने उभी राहू पाहताहेत. त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी त्यांचे शिक्षक अपार मेहनत करत आहेत. या साऱ्यांना आपण आपला एक मदतीचा हात देऊया. त्यांच्यात आणि आपल्यात सेतू बांधू या!

वाचू आनंदे

इस्रो - झेप नव्या क्षितिजाकडे

लेखक: आर. आरवमुदन **अनुवाद:** प्रणव सखदेव
रोहन प्रकाशन
मूल्य: ₹२९५/- **वाटपातील किंमत:** ₹१९८/-

अंतराळात स्थानक आणि तिथे आपल्या भारतातील शुभांशु शुक्ला, ज्याच्याशी चक्क संवाद साधता येतोय, केव्हढी मोठी झेप! अंतराळात झेपावण्याचे भव्य स्वप्न पाहणे, त्या स्वप्नाच्या पूर्तीसाठी झोकून देऊन काम करणे आणि येणाऱ्या अडचणींनी डगमगून न जाता त्यातून शिकत, सुधारणा करत, प्रगती साधणे कसे शक्य झाले, याची गोष्ट सांगणारे पुस्तक 'इस्रो – मी अनुभवलेलं एक अभूतपूर्व स्वप्न'.

अंतराळ संशोधनासाठी राष्ट्रीय समितीची स्थापना झाली १९६२ साली. सुरुवातीच्या प्रशिक्षण काळापासून इस्रो आकाराला येईपर्यंत ह्या अंतराळ मोहिमांशी जोडले गेलेले व सतीश धवन स्पेस सेंटर आणि इस्रो सेटलाइट सेंटर यांचे संचालकपद भूषविलेले आर.आरवमुदन यांनी शब्दबध्द केलेले स्वानुभव या पुस्तकाद्वारे आपल्याला एका वेगळ्या विश्वाची सफर घडवतात.

अंतराळात झेप घेण्यासाठी देशपातळीवर जे शिस्तबध्द भगीरथ प्रयत्न केले गेले त्याची माहिती वाचून आपले मन अभिमानाने भरून येते आणि मस्तक आदराने झुकते. १९६३ साली नोव्हेंबर मध्ये भारताने पहिलं साउंडिंग रॉकेट प्रक्षेपण केलं. त्याच्या सहाय्याने वेगवेगळ्या उंचीवरच्या वाऱ्याच्या झोतांच मोजमाप केलं. या प्रक्षेपणाच्या सुरक्षाविषयक बाबींचे प्रमुख डॉ. अब्दुल कलाम होते.

विक्रम साराभाई, डॉ. होमी भाभा, डॉ. सतीश धवन, डॉ. कस्तुरीरंगन यांच्या सारख्या द्रष्ट्या आणि उत्तुंग व्यक्तिमत्वाच्या वैज्ञानिकांचे नेतृत्वगुण, कामाप्रती बांधिलकी आणि प्रसिध्दी परांग्मुखता यांचे विलोभनीय दर्शन विविध प्रसंगातून घडते. सुरुवातीस असणारे कौटुंबिक वातावरण थुंबाच्या लहान लहान यशासाठी खूपच पोषक ठरले. त्या काळातील हृद्य आठवणी मुळातून वाचायला हव्यात.

समारोपाच्या चार शब्दात लेखक म्हणतात त्यानुसार '...इस्रोची कहाणी आत्ता कुठे सुरू झाली आहे'. हा अनुभव आपण आता घेतच आहोत!

– वसुंधरा देवधर

लिफ्ट मेंटेनन्स मक्तेदारी नको!

– अजित वर्तक, गोरेगाव

नवीन इमारतींमध्ये ज्या लिफ्ट बसवल्या जातात, ह्यामध्ये काही पार्ट (उदा. कंट्रोल पॅनल) मुद्दाम असे ठेवले जातात की ते जेनेरिक नसतात. त्यात युनिक कोडिंग असते, ज्यामुळे आपल्याला लिफ्ट मेंटेनन्स फक्त त्या विशिष्ट कंपन्यांनाच द्यावा लागतो. लिफ्ट बसवताना बिल्डर लोकांना स्वस्तात लिफ्ट इन्स्टॉलेशन करून दिले जाते. त्यामुळे नंतर त्याचा AMC चा वाढत बोजा रहिवाशांवर पडतो. काही कंपोनंट एन्कोडेड असल्यामुळे आपण AMC थर्ड पार्टीला देऊ शकत नाही. यामुळे त्यांची मक्तेदारी होते. ग्राहकांना निवडीचा अधिकार हवा, म्हणून लिफ्ट पोर्टेबिलिटी पाहिजे. त्यातले कुठलेही सॉफ्टवेअर किंवा हार्डवेअर लॉक नसावे. कंपोनंट जनरिक असावे.

हटके, हेल्दी प्रसाद

– **नेहा जोशी**

सणासुदीचे दिवस आले की विविध प्रकाराच्या मिठाया, प्रसादासाठी पेढे, खवा यांची मागणी वाढते. अधिक नफा कमविण्यासाठी या काळात या अन्न पदार्थांमध्ये भेसळ जास्त प्रमाणात आढळून येते. म्हणूनच आपल्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी आपण सर्व ग्राहकांनी सतर्क राहून शक्यतो विकतची खव्याची मिठाई, प्रसादासाठी घेणे टाळावे. काही वर्षांपूर्वी FSSAI ने ट्रेमधील सुट्या मिठाईवर (पॅकबंद नाही अशी) बेस्ट बिफोर (best before) तारीख असावी असा नियम जारी केला होता, २०२३ मध्ये हा नियम 'बंधनकारक' या श्रेणीतून वगळण्यात आला आहे. त्यामुळे सुटी मिठाई घेणे अधिक धोक्याचे झाले आहे. प्रसादासाठी सोप्या, चटकन होणाऱ्या पाककृती करून प्रसाद घरीच करू शकतो-

१) **विविध स्वादाचे मोदकः** पान मोदकः विड्याची पाने, दूध, साखर मिक्सरमधून फिरवून घ्यावे. सुक्या खोबऱ्याचा कीस तुपावर भाजून घ्यावे. मग त्यात वरील मिश्रण घालून गोळा करून घ्यावा. गार झाले की मोदकाच्या साच्यात घालून (आत गुलकंद सारण म्हणून घालू शकता) मोदक करावेत. विड्याच्या पानांऐवजी ऑरेंज मार्मालेड वापरून संत्र्याच्या स्वादाचे मोदक करता येतील. असेच आंब्याचा किंवा स्टॉबेरीचा रस वापरून आंब्याचे मोदक होतील.

२) **पंचखाद्यः** पारंपारिक प्रकारात खवा वापरतात, पण आपण खोबरे, खसखस, खारीक, खडीसाखर, खजूर वापरून पंचखाद्य करू शकतो. खोबरे भाजून घ्यावे. खसखस पण मंद गॅसवर भाजून घ्यावी. खजूर बारीक करून घ्यावा. मग सगळे एकत्र करावे. पंचखाद्य मोदक पण करता येतील. यात खजूर बारीक करून तूप घालून परतून घ्यावे. मग सर्व मिश्रण एकजीव करून मोदक साच्यातून मोदक वळावेत. (अंजीर-खजूर मोदक पण करता येतील.)

३) सुके खोबरे परतवून त्यात पिठीसाखर घालून पारंपरिक खिरापत तयार होते. नावीन्य म्हणून त्यात सुकामेवा घालता येईल.

४) नाचणीचा रवा वापरून शिरा करता येईल. हा शिरा मोदकाच्या साच्यात घालून त्याचे मोदक करता येतील.



५) गूळपापडीच्या, तसेच रवा बेसन/खोबऱ्याच्या वड्या करता येतील. थोडे नियोजन करून आधीच असा प्रसाद तयार करून ठेवता येईल. हे पदार्थ बनवायला लागणारे जिन्नस नाचणी रवा, डेसिकेटेड खोबरे, पिठीसाखर, पत्री खडीसाखर, दूध मसाला, सुके खोबरे, बेसन, खारीक पावडर पुरवायला मदतीला आपली वाटप व्यवस्था आहेच! तर मग लागू या ना तयारीला.

करप्रणाली - नवी की जुनी?

– उदय पिंगळे, अर्थ अभ्यासक

यंदाच्या अर्थसंकल्पना 'नवी आणि जुनी करप्रणाली' याबाबत कोणत्या तरतूदी जाहीर झाल्या आहेत. त्याचे सोप्या भाषेतील विवेचन-

पगार/पेन्शन, व्यवसाय, घरभाडे, भांडवली नफा आणि या चारही गोष्टी वगळून मिळणारे अन्य कोणतेही उत्पन्न यास इतर उत्पन्न म्हटले जाते. यातील एक वा अधिक गोष्टींमुळे व्यक्तीच्या उत्पन्नात वाढ होत असते. यातील काही गुंतवणूक/खर्च, सवलती आणि सूट यांचा विचार करून घेऊन करपात्र उत्पन्न मोजले जाऊन त्यावर कर आकारणी केली जाते.

या वर्षीचा (सन २०२५-२६) अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्रांनी नवीन करप्रणालीत १२ लाख रुपयांपर्यंतच्या करपात्र उत्पन्नावर 87 ए नुसार अधिकतम ₹ ६०,०००/- ची करसूट दिली आहे. आयकर टप्पातही बदलण्यात आले आहेत त्यामुळे आता ही प्रणाली स्वीकारणाऱ्यांना रुपये चार लाख ही प्राथमिक करमुक्त उत्पन्न मर्यादा आहे. त्यानंतर प्रत्येक टप्पा ४ लाख रुपयांने वाढून त्यावर 5%, त्यापुढील चार लाखाच्या प्रत्येक टप्यावर 5% अधिक करवाढ केली आहे. त्यामुळे करटप्पा चारच्या पाढ्यात आणि कर पाचच्या पाढ्यात वाढत जाऊन रुपये चोवीस लाखावर करपात्र उत्पन्न असल्यास 30% दराने आयकर द्यावा लागेल. उत्पन्न १२ लाखाहून अधिक असेल तरच चार लाखावरील उत्पन्नापासून कर द्यावा लागेल. मागील वर्षाच्या तुलनेत ही वाढ घसघशीत असून त्यामुळे जवळपास 90% करदात्यांना आयकर द्यावा लागणार नाही. त्याचप्रमाणे त्याहून अधिक उत्पन्न असलेल्या करदात्यांचे करदायित्व लक्षणीयरीत्या कमी होईल. मात्र, विशेष दराने कर आकारणी होणाऱ्या करपात्र उत्पन्नांस ही सवलत लागू नाही.

जुनी करप्रणाली ७० विविध गुंतवणूक आणि खर्चांवरील करसवलतीसह जास्त दराने कर आकारते, तर नवीन प्रणालीत बहुतांश सर्व सवलती रद्द करून कमी दराने कर आकारणी करते. अलीकडे आयकर विवरणपत्र भरताना गुंतवणूक किंवा खर्चाचे कोणतेही पुरावे जोडावे लागत नाहीत. जुन्या प्रणालीतील असलेल्या अनेक करसवलतींचा दुरुपयोग करदात्यांनी केला हे शोधता येणे शक्य असले तरी ते तितकेसे व्यवहार्य नाही. त्यामुळे ते टाळण्यासाठी तसेच कर भरण्याची प्रक्रिया सोपी करण्यासाठी नवीन प्रणाली आणण्यात आली.

नव्या करप्रणालीची वैशिष्ट्ये

- नव्या प्रणालीत भांडवली नफा सोडून ज्यांचे करपात्र उत्पन्न १२ लाख रुपयांपर्यंत आहे, त्यांना कोणताही कर भरावा लागणार नाही.
- कर रचनेत सुधारणा: करपात्र उत्पन्नाच्या प्रत्येक टप्प्यात कर दरांमध्ये भरीव वाढ करण्यात आली आहे, त्यामुळे बहुतांश करदात्यांचा कर भार कमी होईल.
- विशेष उत्पन्नांवर सूट नाही: भांडवली नफ्यासारख्या विशेष प्रकारच्या उत्पन्नावर करसवलत लागू होणार नाही. उदाहरणार्थ, ज्यांचे उत्पन्न विविध स्रोतांमधून येते आणि ते काही विशिष्ट प्रकारांत मोडते, त्यांना नवीन प्रणालीतील करसवलत मिळणार नाही.

जुन्या करप्रणालीतील वैशिष्ट्ये

- **भिन्न प्रारंभिक कालमर्यादा:** कर आकारणी करताना सर्वसाधारण, ज्येष्ठ आणि अतिज्येष्ठ असे वर्गीकरण असून त्यांची प्रारंभिक करमर्यादा अनुक्रमे रुपये अडीच लाख, तीन लाख आणि पाच लाख अशी आहे.
- **कर वजावटीगुंतवणूक प्रोत्साहन:** जुन्या प्रणालीत विविध गुंतवणुकींवर कर सवलत दिली जात होती. उदाहरणार्थ, पीपीएफ, एलआयसी, एनएससी,

गृहकर्जाच्या व्याजावर आणि इतर अनेक घटकांवर कर वजावट मिळत होती.

- **करपात्र उत्पन्नाचे टप्पे:** जुन्या प्रणालीत पाच लाखांपर्यंत करपात्र उत्पन्न असेल तर 87A नुसार अधिकतम ₹12,500/- ची सूट मिळते. त्याहून अधिक उत्पन्न असल्यास कराची मोजणी प्रारंभिक टप्यावर केली जाते.
- **जुन्या आणि नव्या कर प्रणालीतील तुलना:** गेल्यावर्षीपर्यंत कर सवलती घेणाऱ्या करदात्यांना जुनी कर रचना उपयुक्त होती. तरीही 72% करदात्यांनी नवीन प्रणालीचा स्वीकार केला.

यावर्षी नवीन करप्रणाली स्वीकारण्याचे फायदे आणि तोटे

फायदे :

- कमी कर दर आणि सोपी प्रक्रिया
- १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांसाठी मोठी करसवलत
- सोपे विवरणपत्र

तोटे :

- गुंतवणुकींवर मिळणाऱ्या करसवलती रद्द
- विशिष्ट उत्पन्न गटांना कर सवलतीचा लाभ नाही
- खर्च वाढण्याची शक्यता (गुंतवणुकीऐवजी खर्चाला प्रोत्साहन मिळू शकते)
- नवीन प्रणाली लागू करण्यामागील सरकारचा उद्देश
- करप्रणाली सोपी करणे
- कर चुकवेगिरी टाळणे
- अधिकाधिक करदाते विवरणपत्र दाखल करतील याची खात्री करणे
- देशातील जनतेची क्रयशक्ती म्हणजेच वस्तू आणि सेवा खरेदी करण्याची क्षमता वाढवून अर्थव्यवस्थेला चालना देणे

कोणती प्रणाली निवडावी?

- मोठ्या प्रमाणात ज्यांना गुंतवणुकीवरील करसवलत हवी असेल किंवा या सवलती घेऊन भांडवली नफा अधिक असेल त्यांनाच जुनी प्रणाली कदाचित योग्य असण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने मोजणी करावी.
- ज्यांचे उत्पन्न साधे आणि गुंतागुंतीशिवाय आहे, त्यांच्यासाठी नवी प्रणाली फायदेशीर ठरू शकते.
- १२ लाखांपर्यंत करपात्र उत्पन्न असणाऱ्यांसाठी नवीन करप्रणाली उत्तम पर्याय आहे.

निष्कर्ष

नवीन करप्रणाली करदात्यांसाठी सोपी, अधिक आकर्षित बनवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्यांनी करदात्यांसाठी दोन्ही पर्याय खुले ठेवले आहेत. मात्र 'रुपये १२ लाख उत्पन्नावर आयकर नाही' हे अधिकाधिक लोकांना लागू पडत असल्याने बहुतेक लोक नवीन प्रणाली स्वीकारतील, अशी शक्यता आहे. त्यामुळे जुनी प्रणाली भविष्यात कालबाह्य ठरू शकते. मात्र नेमकी कोणती प्रणाली निवडायची? हे ठरवताना करदात्याने स्वतःचे करपात्र उत्पन्न आणि दोन्हीही प्रणालीतील फायदा तोट्याचा विचार करून करदेयता कमी असलेली पध्दती स्वीकारावी. व्यावसायिक उत्पन्न नसलेल्या करदात्यांना आर्थिक वर्षात कोणती पध्दती योग्य ठरेल त्यानुसार जुन्या अथवा नवीन कोणत्याही करपध्दतीची निवड करून करदेयता निश्चित करता येईल आणि सोयीनुसार बदल करता येईल. मात्र यासाठी करदात्याने आपले आयकर विवरणपत्र विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे.

लाडू, पेढे, बर्फी... अवघी मिठाई माझी!

– अंजली पोतदार

आषाढी किंवा देवशयनी एकादशी झाली कि विठूमाऊली चार महिने निद्रेसाठी जाते. ते ४ महिने उपास-तापास आणि व्रत वैकल्याच्या निमित्ताने सामान्य भक्तमंडळी प्रसादाच्या नावाखाली गोडधोड खाण्यात रंगून जातात. २-४ दिवसांनी काहींना काही निमित्ताने प्रसाद म्हणून काहीतरी गोड पदार्थ आणायचा ना? मग आणा पटकन ४ पेढे, किंवा लाडू-बर्फी. कारण हे सगळं घरी करत बसायला वेळ आहे कोणाकडे? असं करताना या काळात मिठाईची मागणी वाढत जाते. गौरी गणपती, दसरा, दिवाळीपर्यंत तर ही मागणी अगदी प्रचंड वाढते. पण या मागणीच्या प्रमाणात दूध, खवा, मावा, तूप याचे उत्पन्न वाढते का? असा एक प्रश्न सर्वसामान्य ग्राहक म्हणून कायम मनात येतो.

दुधाचे उत्पन्न तेवढेच राहते. पण दुधापासून बनणाऱ्या मिठाईची मागणी मात्र वाढते. मग यावर उपाय काय? तर बनावट दूध तयार करणे. यासाठी थोडे दूध किंवा दुधाची भुकटी आणि जास्ती पाणी, रसायने यांचे मिश्रण करून बेमालूमपणे निकृष्ट दूध तयार केले जाते. त्यापासून खवा, मावा, पनीर, चीज सारखी दुग्धजन्य उत्पादने बाजारात येतात. हल्ली उपाहारगृहांतील पदार्थांवर नजर टाकली असता जवळजवळ प्रत्येक पदार्थात पनीरचा सढळहस्ते वापर झालेला दिसतो. रसगुल्ले, मलाई सँडविच यासाठीही या पनीरचा वापर केला जातो. मग एवढं पनीर कस काय तयार करत असतील बर? मध्यंतरी फेक पनीरचं प्रकरण गाजलं. उपहारगृहात आणि रस्त्यावर विकल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेविषयी मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

बऱ्याच वर्षांपूर्वी चीनमध्ये तीन लाख शिशूंमध्ये मूत्रपिंडांचे आजार दिसायला लागले. खोलात गेल्यावर ते त्यांच्या आहारातील दुधात मिसळलेल्या मेलामाईनमुळे असे लक्षात आले. मेलामाईन हे एक घातक रसायन आहे. ते दुधात मिसळले तर दुधाचा SNF म्हणजे Solid Non Fat वाढल्यासारखा दिसतो. चाचणी केल्यास या दुधात प्रोटीनचे प्रमाण योग्य आढळून येते. हे प्रोटीनचे प्रमाण मेलामाईन मधील नायट्रोजनमुळे वाढते हे सिध्द झाले. लहान बाळांच्या आयुष्याशी किती क्रूर खेळ होता हा. मिठाईमध्ये भेसळयुक्त दुधाबरोबरच एखाद्या रंगांचा वापर करणे, चांदीचा सांगून ॲल्युमिनियमचा वर्ख लावणे, काजूकतलीमध्ये काजूच्या डोळ्याच्या म्हणजे काजूच्या दोन पाकळ्यांमधील टाकाऊ भागाची पावडर वापरणे, तुपाच्या ऐवजी वनस्पती तेल वापरणे- अशा अनेक प्रकारे मिठाईमध्ये भेसळ केली जाते. गाईच्या किंवा म्हशीच्या चिकापासून खरवस न बनवता चायनाग्रासपासून खरवस करणे ही सुध्दा एक प्रकारची दिशाभूल आहे.

मग एक जागरूक ग्राहक म्हणून मिठाई विकत घेताना आपण काय काळजी घेतली पाहिजे ते पाहू.

- पेढे, बर्फी हे शुध्द दूध, तूप यापासून बनतात. खूप उष्णतेमुळे त्यांचा रंग शुभ्र पांढरा राहू शकत नाही. थोडा ब्राउनिश होतो. पेढे, बर्फी शुभ्र पांढरी राहण्यासाठी त्यात हैड्रोप्रॉडक्ट घालावी लागतात, जी रसायने असतात. म्हणून पांढरी शुभ्र बर्फी किंवा लाल, पिवळी, हिरवी बर्फी शक्यतो घेऊ नये.
- शुध्द बर्फी ही थोडी कोरडी असते. चकचकीत किंवा चिकट नसते.
- मावा खावा विकत घेताना थोडा चाखून पाहावा. थोडा रवाळ आणि गोड लागला पाहिजे. मऊ, मेणचट, कडवट नसावा.
- चांदीचा वर्ख लावलेल्या मिठाईचा वर्ख बोटाने काढून चुरगाळला तर त्याची पावडर होते. पण जर तो ॲल्युमिनिमचा असेल तर वर्खाच्या छोट्या छोट्या गोळ्या होतात. चांदी सध्या इतकी महाग झालेली असताना त्याचा वर्ख लावलेली मिठाई किती महाग होईल, याचा सूज्ञ ग्राहकाने विचार करावा. तो वर्ख बहुतांश वेळा चांदीचा नसण्याचीच शक्यता अधिक असते.
- शक्यतो माहितीच्या हलवायाकडून मिठाई घ्यावी. आता नामवंत कंपन्यांचे ब्रँडेड पॅकेज्ड मिठाईही उपलब्ध आहे. ती घेऊन बघावी.
- खवा, मावा, पनीर हे पदार्थ घरी दूध आणून करावे. थोडा वेळ द्यावा लागतो, पण शुध्दतेची खात्री मिळते.

- विकतचा पनीर, खवा, मावा आणल्यास त्याच्या एका छोट्या तुकड्यावर टिंक्चर आयोडीनचे २ थेंब टाकून बघावे. जर पिवळा ब्राउन रंग आला तर तो शुध्द समजावा. जर निळा, काळा रंग आला तर त्यात पिष्टमय पदार्थांची भेसळ आहे, हे समजावे. त्यात पीठ, मैदा, साबुदाण्याची पावडर याचा समावेश होतो.
- मिठाई हा नाशवंत पदार्थ आहे, त्यामुळे थोड्याच प्रमाणात खरेदी करावी. सुटी मिठाई जास्तीत जास्त ४ ते ५ दिवस चांगली राहू शकते. मग त्यावर बुरशी येऊ शकते. पॅकेज्ड मिठाई १ ते ३ महिने टिकू शकते.
- सुका मेवा घातलेली मिठाई कुठे स्वस्त मिळत असेल तर घेण्यापूर्वीच विचार करावा. कारण सुका मेवा सध्या खूप महाग आहे. त्यामुळे स्वस्त मिठाईत त्याचे प्रमाण नगण्य असते.
- सर्वात प्रभावी शेवटचा उपाय म्हणजे प्रसाद म्हणून मिठाई ऐवजी सुका मेवा, ताजी फळे, घरी केलेले लाडू, खिरी, हलवा यांचा वापर करावा.

नवीन संघास मान्यता

संघ	संघ कोड	सभासद
मुंबई		
आसमंत संदेश ग्राहक संघ	22242GO	१४
पूर्वरंग - १ ग्राहक संघ	42188ML	७
पूर्वरंग - २ ग्राहक संघ	42189ML	८
जागृत ग्राहक संघ	12153GR	७
दिप्ती ग्राहक संघ	12236VP	८
दिगंत ग्राहक संघ	12536SZ	११
समृध्दी ग्राहक संघ	21564GO	१०
आवास क्लासिक ग्राहक संघ	41560DH	८
ओबेरॉय इंटरनिया ग्राहक संघ	42515ML	११
ठाणे		
नेवा भक्ती पार्क, ऐरोली ग्राहक संघ	15685TN	१२
ड्रीमलँड, भास्कर कॉलनी ग्राहक संघ	15687TN	१७
हिरवाई, रेमंड ग्राहक संघ	15686TN	१२
रायगड		
गुरुमाऊली ग्राहक संघ	17197RG	८
सोनचाफा ग्राहक संघ	17824RO	१२

बोरिवलीत मुलांसाठी पर्यावरण शिबीर

बोरिवली विभागात ५ जून रोजी जागतिक पर्यावरणदिनी शिबीर घेण्यात आले. त्यात ४६ मुलांनी भाग घेतला. त्यांना रिकाम्या काचेच्या बाटल्यांपासून शोभेची वस्तू कशी बनवायची याची माहिती देण्यात आली. वारली पेंटींग शिकवताना त्यामागचा इतिहासही सांगण्यात आला. मधल्या वेळेत दुपारी मुलांनी भोजनाचा आस्वाद घेतला. नंतर दुसऱ्या पर्वाला सुरुवात केली आणि दुकानातून कागदाचे पाकीट विकत घेण्यापेक्षा घरच्या घरी कशी सुरेख व सुंदर पाकिटे बनवायची त्याची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. दिवसभराच्या शिबीरानंतर औषधी रोपं वाटण्यात आली. यावेळी विभागाच्या अध्यक्ष डॉ. सुहासिनी संत उपस्थित होत्या. २२ कार्यकर्त्यांचा सहभाग आयोजनात होता.

बोरीवली शिबीरात काचेच्या बाटल्या रंगवल्यावर आणि प्राण्यांची चित्रे चिकटवलेली एन्व्हलप्स तयार केल्यावर उत्साहीत झालेली मुले

Global ODR च्या प्रस्तावाला मान्यता दिल्याबद्दल UNCTAD चे आभार मानताना आणि त्यावर काही सूचना करताना ॲड. शिरीष देशपांडे

मलेशियन Competition Commission सदस्य सुरेंद्रन यांच्यासह. त्यांनी MGP बद्दल ऐकले होते. पूजाने त्यांना आपली वाटप व्यवस्था समजावून सांगितली.

रशियाच्या मंत्र्यांबरोबर ग्राहक चळवळी संबंधी चर्चा करताना

अंक्टाडचे अर्नाव यांना संस्थेतर्फे मानचिन्ह भेट देताना

अंक्टाडच्या RPP च्या प्रमुख इब्रु यांनी शिरीष देशपांडे यांना "40 Years of UNGCP - Its Global Impact" या विषयावर संयुक्त राष्ट्रांच्या ग्राहक संरक्षण परिषदेत निमंत्रीत केले. त्यांना संस्थेतर्फे मानचिन्ह देताना

Consumer Product Safety बाबत सदस्य राष्ट्रांनी संमती दिल्यामुळे उल्हसित झालेल्या अंक्टाडच्या अर्नाव यांचे अभिनंदन करताना

७ जुलै, स्थळ- जिनिव्हा, अभिमानाचा क्षण!

– पूजा जोशी-देशपांडे

मुंबई ग्राहक पंचायत या आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण आणि पूर्णपणे ग्राहकहितासाठी कार्यरत असलेल्या, या संस्थेशी २०१९ पासून कार्यकर्ता म्हणून जोडली गेल्याने, मला मनापासून सर्वतोपरी योगदान देण्याची संधी या संस्थेत कायम मिळाली आहे. संस्थेतील सर्व कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून मला देखील सतत मनापासून काम करत रहावे असे वाटते.

देशपांडे सरांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे मला ग्राहक संरक्षण विभागात कार्य करण्याची आणि त्यातून नवनवीन शिकण्याची अनमोल संधी मिळाली. त्यांच्यासोबत लिहिलेला लेख UNCTADच्या जागतिक व्यासपीठावर प्रसिध्द झाला. ही संधी देखील अविस्मरणीय आहे. संयुक्त राष्ट्र परिषदेच्या व्यापार आणि विकास परिषद (United Nations Conference on Trade and Development - UNCTAD) अंतर्गत 'Research Partnership Platform (RPP)' योजनेत आयोजित '40 Years of UNGCP & Its Global Impact' या विषयावरील परिषदेच्या पहिल्या दिवशी (७ जुलै) मुंबई ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे सर यांनी जागतिक व्यासपीठावर आपले विचार प्रभावीपणे मांडले. त्यांनी जागतिक ग्राहक संरक्षण धोरणांची समीक्षा करताना, ग्राहकांना सक्षम करणाऱ्या आंतरराष्ट्रीय आणि स्थानिक धोरणांची गरज अधोरेखित केली. तसेच, ग्राहक हक्कांचे रक्षण सुनिश्चित करण्यासाठी प्रभावी जागतिक यंत्रणा उभारण्याचा ठोस प्रस्ताव मांडला. हा क्षण मी प्रत्यक्ष अनुभवला आणि तो माझ्यासाठी अविस्मरणीय आहे. सरांचे सातत्यपूर्ण प्रयत्न आणि मेहनत यामुळे मुंबई ग्राहक पंचायतीला जागतिक स्तरावर आदरणीय स्थान प्राप्त झाले आहे.

गेल्या दोन महिन्यांत देशपांडे सरांसोबत काम करताना मी अनेक गोष्टी शिकले. मला UNCTAD IGE परिषदेत सहभागी होण्याची सुवर्णसंधी मिळाली, त्याबद्दल संस्थेचे मनःपूर्वक आभार आणि कृतज्ञता!

• POSTAL REGISTRATION NO. MCN/158/2023-2025 • WPP LICENSE NO. MR/TECH/WPP-137/NORTH/2023-2025
• LICENSE TO POST WITHOUT PREPAYMENT, ON 5TH & 6TH • VILE PARLE (W) P.O. MUMBAI - 400 056
RNI NO. MAHBIL/2011/39044

In the UNCTAD meeting at Geneva, after the success of Global Online Dispute Resolution Mission, the Secretary General Rebeca Grynspan responded, **"MGP India is doing good work for years. Shirish, you are a Role Model of Consumer Advocacy."**

Secretary General Rebeca Grynspan while accepting a token of appreciation at Geneva

Such accolades from the UNCTAD Secretary-General, the highest-ranking official, truly mark a global honour for our organisation. Also, Hugh Stevenson from Fair Trade Commission, USA graciously paid tribute to the persistence in successfully pursuing the Global ODR mission by Shirish Deshpande and MGP. Hearty congratulations to Shirish Deshpande. He makes us proud!

ग्राहक पंचायत पेठ वेळापत्रक – २०२५-२६

१.	०७ ऑगस्ट २०२५ ते ११ ऑगस्ट २०२५	**लायन्स क्लब हॉल,** कचेरी रोड, पालघर (प)	५ दिवस
२.	०९ सप्टेंबर २०२५ ते १६ सप्टेंबर २०२५	**सूर्यवंशी हॉल,** दादर (प)	८ दिवस
३.	१७ सप्टेंबर २०२५ ते २४ सप्टेंबर २०२५	**कांती विसारिया हॉल,** नौपाडा, ठाणे (प)	८ दिवस
४.	२५ सप्टेंबर २०२५ ते २९ सप्टेंबर २०२५	**सिंफनी बँक्वेट हॉल,** सहार रोड, अंधेरी (पू)	५ दिवस
५.	२६ सप्टेंबर २०२५ ते २८ सप्टेंबर २०२५	**सेतू बांधा रे! (विशेष पेठ) सिंफनी बँक्वेट हॉल,** तिसरा माळा, अंधेरी (पू)	३ दिवस
६.	३० सप्टेंबर २०२५ ते ०६ ऑक्टोबर २०२५	**गणपतराव वर्तक हॉल,** न्यू इंग्लिश स्कूलसमोर, वसई (प)	७ दिवस
७.	०७ ऑक्टोबर २०२५ ते १४ ऑक्टोबर २०२५	**भाटियावाडी हॉल,** बाभई, बोरीवली (प)	८ दिवस